गुरुवार, १६ मार्च २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१९७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • THURSDAY 16 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-197 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11% व्याजदर
* नियम व अटी लागू
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (टाळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डाण पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड्डे निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०५ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बाजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासुणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्ची बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

## भानुदास एकनाथच्या जयघोषात फुटली दहीहंडी






आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण : नाथषष्ठी उत्सव सोहळ्यात नाथवंशजांच्या हस्ते काल्याची दहीहंडी फोडून बुधवारी नाथषष्ठीची भक्तीपूर्ण वातावरणात सांगता झाली. नाथषष्ठीचा अभूतपूर्व सोहळा अनुभवून लाखो वारकरी भाविकांनी काल्याचा प्रसाद घेऊन श्री क्षेत्र पैठणनगरीचा निरोप घेतला. परंपरेनुसार नाथ वंशज रावसाहेब महाराज गोसावी यांच्या हस्ते नाथ समाधी मंदिरात तर नाथ विश्वस्ताच्या वतीने वारकऱ्यांच्या हस्ते सुर्यास्त समयी दहीहंडी फोडण्यात आली.**

दहीहंडीला लावण्यात आलेले लाडू मिळविण्यासाठी वारकरी भाविकांची स्पर्धा लागल्याचे दृश्य नाथ समाधी मंदिराच्या दरबारात दिसून आले. दहीहंडीचा काला फोडण्यापूर्वी टाळ, वीणा आणि मृंदगाच्या तालावर, हाती भगवा ध्वज पताका घेऊन भानुदास एकनाथांचा जयघोष करीत वारकऱ्यांबरोबरच उपस्थित मान्यवरांनी ठेका धरला. "ज्ञानोबा माऊली तुकाराम, जय जय रामकृष्ण हरी गजर' करीत वारकऱ्यांसोबत मान्यवरांनीही फुगडी खेळून लक्ष वेधून घेतले. दहीहंडीला लावलेला भाग्य उजळवणारा लाही, मुरमुरे व गुळमिश्रित लाडू पकडण्यासाठी भाविकांची एकच झुंबड उडाली. दहीहंडी फोडल्यानंतर नाथवंशजांनी भाग्य उजळविणारे लाडू भाविकांत फेकले. त्या वेळी लाडू ज्या भाविकांच्या हातात पडला त्यास तेथील भाविकांनी गराडा घालून लाडूचा प्रसाद मिळविण्यात धन्यता मानली. या वेळी महिलांच्या गर्दीत जवळपास पाच लाडू फेकले होते. त्या ठिकाणी महिलांची उत्कंठा शिगेला पोचली होती.

लाडूचा हा प्रसाद दहीहंडीच्या काल्याच्या प्रसादापेक्षाही महत्त्वाचा व रंगतदार वाटला. ज्या दिशेने हे लाडू फेकले जातील त्या दिशेने भाविक अक्षरशः जिवाची पर्वा न करता लाडूचा प्रसाद मिळविण्यात दंग झालेले दिसून आले. काहींचा गर्दीत कोसळून पडून प्रसाद मिळविल्याने आनंद गगनात मावेनासा झाला होता. यावेळी संभाजीनगरचे पालकमंत्री तथा पैठणचे आमदार संदिपान भुमरे यांची उपस्थिती होती, तसेच जि.प.चे. माजी सभापती विलासबापु भुमरे, मुंबई महानंदचे संचालक नंदलाल काळे, माजी आमदार संजय वाघचौरे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय गोर्डे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहीया, जितु परदेशी, निमेश पटेल, लक्ष्मण औटे, रेखाताई कुलकर्णी, बंडु आंधळे, कैलास बरकसे, प्रशांत आव्हाड, शिवराज पारिक, आबासाहेब मोरे, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## गारपिटीचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नागपूर विभागात चार दिवस गारांसह अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. नागपूर, चंद्रपूर, गडचिरोलीत ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार नागपूर विभागात उद्यापासून (दि.16) 19 मार्चपर्यंत वादळी वारे, गारपीट तसेच पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. 16 व 17 मार्च रोजी नागपूर, चंद्रपूर व गडचिरोली या तीन जिल्हयात अतिसतर्कतेचा इशारा (ऑरेंज अलर्ट) देण्यात आला आहे. गारपीट व वादळी पावसामुळे मनुष्य व वित्तहानी टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले आहे. भारतीय हवामान विभागातर्फे नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यात सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नागपूर , चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत गुरुवार, 16 मार्च व शुक्रवार, 17 मार्च रोजी अतिसतर्कतेचा इशारा (ऑरेंज अलर्ट) देण्यात आला आहे. त्यासोबतच 16 ते 19 मार्चपर्यंत संपूर्ण विदर्भात वादळी वारे तसेच गारांसह पावसाचा इशारा (यलो अलर्ट) देण्यात आला आहे. भंडारा व गोंदिया जिल्ह्यात शुक्रवार 17 मार्च रोजी अतिवृष्टीची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

गारांसह पडणाऱ्या वादळी पावसामुळे शेतीपिके आणि फळपिकांच्या नुकसानीचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. शहरी व ग्रामीण भागात कच्ची तसेच टीनाच्या पत्र्याच्या घरांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तविण्यात आली असल्याने जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी सतर्क राहावे. याकाळात वीजपुरवठा खंडीत होण्याची शक्यता आहे. यासोबतच दुरध्वनी लाईन व पायाभूत सुविधांची हानी होऊ शकते, असे विभागाच्या पूर्वानुमानात म्हटले आहे. वित्त व जिवीतहानी टाळण्यासाठी महसूल प्रशासनातर्फे आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. हवामान विभागातर्फे दिलेल्या अतिसतर्कतेच्या इशारानुसार नागरिकांनीही खबरदारी घ्यावी, असे आवाहन श्रीमती बिदरी यांनी केले आहे.

## कापसाची मारामार, व्यापारी दारोदार..! बाजारपेठ ओस

### खरेदी केंद्रावर कापसाची आवक मंदावली

आधुनिक केसरी न्यूज

गोकुळसिंग राजपूत

सोयगाव : सध्या पांढऱ्या सोन्याची बाजारपेठ ओस पडली आहे. यंदा कमी पावसामुळे नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाचे यंदा उत्पादन कमी झाले. त्यामुळे त्याचा परिणाम बाजारपेठेवर झाला. खरेदी केंद्रावर कापसाची आवक थंडावली आहे. सुरुवातील निसर्गाने साथ दिल्याने कापसासह अन्य खरीप पिकांची चांगली वाढ झाली, पण नंतर संततधार व अतिवृष्टीच्या पावसामुळे 'फुलपगड्या' संपूर्ण गळाल्या, मात्र नवीन पालवी फुटलीच नाही. त्यामुळे कापूस उत्पन्न कमी झाले. मागील वर्षाच्या तुलनेत एका बॅगमागे दीड ते दोन क्विंटल उत्पन्न घटले आहे. कापसाच्या उत्पादनावर त्याचा परिणाम झाला आहे. शेतकरी अडचणीत सापडला आहे. सध्या घरामध्ये असलेल्या कापसाच्या थप्प्या पडून आहे. मात्र, दर कमी मिळत असल्याने कापूस घरात आणि व्यापारी दारात अशी गत झाली आहे.

**दर वाढत नसल्याने चिंता**


आंतरराष्ट्रीय बाजारात इतर देशांच्या तुलनेत भारतीय कापसाची किंमत उंच असून दहा ते बारा हजार रुपये बेल्स (गठान) मिळत आहे . त्यामुळे निर्यातीला चालना मिळत नाही . आजघडीला सेंटचा दर ७९ ते ८५ दरम्यान दोलायमान असल्याने निर्यातदारांनाही अचूक अंदाज येत नसल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले असून कापूस बाजारपेठ विश्लेषकही संभ्रमात असल्याचे सांगितले आहे . भाववाढ होत नसल्याने कापूस विकण्याच्या मन :स्थितीत नाहीत .

**मो .आरिफ मो .लुखमान, उपसरपंच, सावळदबारा, ता . सोयगाव**



**काटा बंद पडण्याची शक्यता :** सध्या कापसाला साडेसहा ते साडेसात हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत भाव मिळत असून शेतकऱ्यांची मन :स्थिती दहा ते बारा हजार भाव मिळाल्यास विकण्याची झालेली आहे . त्यामुळे बाजारपेठेत आवकच नाही . व्यापारीही आता गावागावांत जाऊन कापसाचा शोध घेत असून, शेतकरीही प्रतिसाद देत नसल्याने या व्यापायांचा काटा बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे .

**व्यापारी गावोगावी :** दसऱ्यापासून फुलणारी पांढऱ्या सोन्याची बाजारपेठ अडीच ते तीन महिने होऊनही थंडावली आहे . आतापर्यंत फक्त दहा ते बारा टक्के कापूस विक्रीस आलेला असल्याचे कापूस खरेदी केंद्रावरील व्यापाऱ्यांनी सांगितले आहे . अतिवृष्टीमुळे कापसाच्या उत्पादनात मोठी घट झाली असून शेतकऱ्यांना भाववाढीची प्रतीक्षा असल्याने खरेदीलाही प्रतिसाद नाही . व्यापारी कापसाकरिता गावोगावी जात असून, त्यांनाही शेतकरी कापूस देत नसल्याने रिकाम्या हातानेच परतावे लागत असल्याचे चित्र आहे .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी



# बाळा, मला समजून घेशील ना...?

संत नामदेव, चोखामेळा, जनाबाई, मुक्ताबाई अशा कितीतरी संतांनी तुझं वैभव वाढवलं. आमची निरक्षर असलेली बहिणाबाई इतकं सुंदर काव्य बोलली की भल्याभल्यांनी तोंडात बोटं घातली. स्वातंत्र्यवीर सावरकरांचं योगदान तर काय सांगावं...! त्यांच्या शब्दात सांगायचं तर तू म्हणजे स्वातंत्र्यदेवतेसारखीच आहेस. गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली स्वतंत्रते भगवती तूच जी विलसतसे लाली तू सूर्याचे तेज उदधिचे गांभीर्यही तूचि... या ओळी तुला सुद्धा लागू होतात. ग दि माडगूळकर, मंगेश पाडगावकर, भा रा तांबे, बा भ बोरकर यासारखे कवी, लोकमान्य टिळक, लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आचार्य अत्रे, वसंत कानेटकर, पु ल देशपांडे, राम गणेश गडकरी यांच्यासारख्या अनेक लेखकांनी तुझ्या अंगावर विविध रूपांचा साज चढवला. कविवर्य कुसुमाग्रज, वि स खांडेकर, विंदा करंदीकर यांनी तर मराठी साहित्यात जी भाषेची समृद्धी, श्रीमंती आणली, त्यामुळे साहित्य अकादमीला तुझी दखल घ्यावीच लागली. कुसुमाग्रज तर मराठी मातीबद्दल बोलताना म्हणाले... माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा हिच्या संगाने जागल्या, दऱ्याखोऱ्यांतील शिळा काय बोलू, किती बोलू आणि कसं सांगू असं होतंय मला. आणि माते, तरीही तुझी आज अशी अवस्था ?' 'बाळा, तू म्हणतोस ते सगळं बरोबर आहे. पण या सगळ्या पूर्वसुरींच्या गाथा आपण किती दिवस गाणार ? आता आपण काय करतो ते अधिक महत्वाचं नाही का ? आणखी काही दिवस जर माझ्याकडे लक्ष नाही दिलं तर माझी अवस्था तू कल्पनाही करू शकणार नाहीस अशी होईल. अर्थात सुदैवाने मला माझ्या सुपुत्रांकडून आशा आहे. चांगले दिवस बघायला मिळतील याची खात्री आहे.



## आनंदी पहाट

# नमस्काराच्या ऐवजी तिरस्कार होऊ देऊ नये

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अलीकडच्या काळात अनेकदा वातावरण म्हणावं तितकं मोकळं नसतं. एकप्रकारचा तणाव, दबाव आणि भीती, त्यांतूनच मनांत सतत दडपण निर्माण करणारे काही सदस्य एखाद्या कुटुंबात असतात. त्यांचा आदर करणं, त्यांचा मान राखणं हे नव्या पिढीसाठी आव्हानच असतं. त्या भीतीयुक्त आदरामुळे केलेला नमस्कार खरंच काही साध्य करत असेल का ? सरकारी अधिकारी अथवा कर्मचारी आपल्या कामाबद्दल संपर्कात येतात अथवा त्यांना संपर्क करावा लागतो, तेव्हा देखील अनेकदा त्यांना सक्तीचा रामराम करावा लागतो. त्यांना देखील नमस्कार आदरानंच मिळावा असं का वाटत नाही ? नमस्कारापेक्षा तिरस्कार होण्याची वेळ त्यांच्याबाबतीत का बरं येते ? ह्याची जाणीव
त्यांना होत नसते का ? देखल्या देवाला दंडवत घालण्याची प्रथा देखील पूर्वापार चालत आलेली आहे. रस्त्यानं चालताना, वाहनांतून प्रवास करताना अनेकदा चौकात रहदारी अडवणाऱ्या देवळातील देवाला देखील नमस्कार करायचे सोपस्कार केले जाताना आपण अनेकदा पाहतो. देखल्या देवाला दंडवत घालणाऱ्या ह्या भक्तांची नमस्कार करण्याची तऱ्हा बघितली तर, बघणारी व्यक्ती नक्कीच अचंबित होईल, अशाच त्या तऱ्हा असतात. काही शहरांमध्ये चौकाचौकात निरनिराळ्या देवांची छोटी देवळं असतात, वाहनांतून प्रवास करताना, त्या प्रत्येक देवाला घाईघाईनं नमस्कार करण्याची धडपड आणि केविलवाणी धावपळ सुरु असते. शांतपणे कोणत्याही एकाच देवाला, परंतू शास्त्रोक्त नमस्कार करण्यासाठी ह्याच मंडळींना वेळ मिळत नाही, हीच उणिव म्हणावी लागेल. बरं, ही मंडळी
नमस्कार करत आहेत कि अंगावर काही पडलंय ते झटकत आहेत ? हेच कळत नाही. केल्या जाणाऱ्या नमस्काराचं महत्व लक्षात घेणं जरुरीचं वाटत नाही का ? अन्यथा, अशाबाबतीत तरी काही गोष्टी न करणंच योग्य.



आधुनिक केसरी

**जाणे तो गुढार्थ | जन्माचा ह्या ||**

वासनेची बाधा | घातक मनाला ||
तीने नासवीला | सुखी जीव ||१||
रज तम गुण | दुःखाचे कारण ||
एक सत्व गुण | आनंदाचा ||२||
माया मोह सारे | आशेचे सोबती ||
क्लेशदायी होती | संसारात ||३||
स्वधर्माची गोडी | लागता मनाला ||
थारा वासनेला | नाही तेथे ||४||
होऊनी निस्संग | करी जो परमार्थ ||
जाणे तो गुढार्थ | जन्माचा ह्या ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**अथवाऽनुभवा मित्र**
**प्रकटयन्ति ये स्वयम्।**
**नरे निर्विकारे शान्ते**
**ते एवाध्यात्मिकाः खलु॥**
**अथवा मित्रा, जे अनुभव निर्विकार शांत माणसाचे ठिकाणी स्वयमेव प्रकट होतात, तेच खरोखर आध्यात्मिक होत.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज


**अन्तःकरण अच्छादित, आश वासना नाश । जिव तुम संसारी बने, कौन करे भ्रम नाश ।।२०।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय)**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

आपल्या चैतन्यमय स्वरूपाचं ज्ञान न झाल्याने अंतःकरण प्राकृतीक आशा- वासनांनी आच्छादित होते म्हणजेच झाकले जाते तेंव्हा जीव संसारी होऊन या अज्ञान भवचक्रात पडून नाना प्रकारच्या कष्टांना प्राप्त करतो. आता प्रकृतीच्या या अनित्य संबंधाचं कारण असलेल्या भ्रमाचा नाश कोण करू शकेल ? सद्गुरूंच्या योग-विज्ञानाद्वारे समस्त अज्ञान, मोह आणि भ्रमाचा नाश होतो आणि आत्मा चेतन महान सुखाची प्राप्ती करतो. जड माया आणि चेतन आत्म्याच्या संबंध होण्यामागचे कारण अज्ञान आहे आणि हे अज्ञान सद्गुरूंच्या ब्रम्हविद्या विवेक, अनुभव-साधनेद्वारे नष्ट होते आणि मानव पवित्र आणि उज्ज्वल होतो.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## काव्य-चरितावली



पुष्प १८वे

आधुनिक केसरी




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

**उपासना दत्तावधुतांची केली**
**शके १७३४ फाल्गुन वंद्यवपंचमीला**
**मार्च १८१३ ई.स.मध्ये, पार्वतीबाईंची**
**मनोभावे सेवा फलद्रुप हो जाहली ।।**
**अजानबाहु, तेजस्वी डोळ्यांचा बाळ**
**होता उत्तम त्याचा जन्म वेळचा काळ**
**तुकाराम "हे नाव त्याचे ठेवण्यात आले**
**आईविनाच, वाढू लागला हा बाळ ।।**
**सामान्य बालकांपरी नव्हते याचे वर्तन**
**लक्षणे याची होती सारी विलक्षण**
**काशिनाथपंत ठेवीती नजर याच्यावर**
**परी तुकाराम चपळ, नसे कधी स्थिर ।।**
**म्हणे कवी अरुणदास- तुकामाईचे कार्य**
**सांगण्या, ही लेखणी असे सदा अधीर**

# साधक व नाम

आधुनिक केसरी



प्रत्येक शब्दात रामच आहे असे ज्यांना वाटते त्यांची तयारी काही निराळीच असते. आपल्याला अमुक एका नावातच प्रेम येते; परंतु सिद्धांना मात्र कोणी कशाचाही उच्चार केला तरी नामाचाच केला असे वाटते. कोणत्या वाचेने नाम घ्यावे याचा नाही विचार करू. जसे होईल तसे नामस्मरण करा, पण नामाची कास सोडू नका. नाम घेऊन नामाचा अनुभव घ्या. विषयाचा घाला जेव्हा पडतो तेव्हा नामाची आठवण ठेवा. प्रल्हादाने नामाशिवाय दुसरे काय केले ? प्रल्हादाने नामावर जसे प्रेम ठेवले तसे आपण ठेवावे. आजवरच्या सर्व भक्तांनी हेच केले. एक नामस्मरण करा, हाच खरा मार्ग. स्मरणात रहा म्हणजे विषय आपोआप मरतील. साधकाने लोण्यासारखे मऊ असावे. कोणाला कुठेही खुपू नये, आपण हवेसे वाटावे. आपण निःस्वार्थी झालो तरच हे साधेल. कोणी आपल्या पाया पडताना, 'मी या नमस्काराला योग्य नाही' असे साधकाने मनामध्ये समजावे, म्हणजे कुणी नमस्कार केल्याचा अभिमान वाटणार नाही, आणि न करणाऱ्याचा राग येणार नाही. सत्कर्मानंतर आपली स्तुती ऐकायला साधकाने तिथे उभेसुद्धा राहू नये. भगवंत ज्याला हवा आहे, त्याने असे समजावे की, आपण आता कुस्तीच्या हौद्यांत उतरलो आहोत, अंगाला माती लागेल म्हणून आता घाबरून चालायचे नाही. यासाठी चांगली माणसे पहिल्यानेच मातीत लोळतात, म्हणजे ती लाज जाते. भगवंताच्या प्राप्तीचे दोन मार्ग आहेत : एक मार्ग म्हणजे, आजपर्यंत सर्व त्याच्या इच्छेने घडून आले, माझे जे सर्व आहे ते त्याचेच आहे, त्याचे तो पाहून घेईल, तो जे करील ते सर्वांच्या हिताचेच करील, उद्याचा दिवस त्याच्या इच्छेनेच यायचा आहे, असे मनाशी ठरवून आपण त्याच्या स्मरणात निश्चिंत राहणे हा होय. दुसरा मार्ग म्हणजे, 'मी जगात कुणाचाच नाही, मी रामाचा आहे' असे म्हणून कुठेही प्रेम न ठेवता त्याच्या स्मरणात राहणे हा होय. हा मार्ग जरा कठीण आहे. यामध्ये मनाने इतर ठिकाणचे प्रेम तोडून टाकायचे असते, कारण प्रेम एकाच वस्तूवर राहू शकते. मन जर आपले ऐकत नसेल तर न ऐकू द्या. आपण चांगले-वाईट शोधावे, आणि त्याप्रमाणे करू लागावे; मन आपोआप तिथे येईल. म्हणूनच, 'आपले मन मारा' असे न सांगता 'आपले मन भगवंताकडे लावा' असेच संत आपल्याला सांगतात.

**आजचे बोधवचन आहे - " हेच माझे सर्वस्व आहे, " असे नामात प्रेम असावे.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

मिरासीचें म्हूण सेत । नाहीं देत पीक उगें ॥२॥
तुका म्हणे उचित जाणां । उगीं सिणा काशाला ॥३॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, १६ मार्च २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari




# रस्ते विकासासाठी 48 कोटी 72 लाखांचा निधी मंजूर

## खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**दत्ता गोजेगावकर**

**मुखेड :** नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नातून नांदेड जिल्ह्यातील अनेक रस्त्याच्या विकासासाठी तब्बल 48 कोटी 72 लाख 56 हजारपर्यंत मंजूर करण्यात आला आहे. या निधीची तरतूद नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केली आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील अनेक रस्त्यांचा प्रश्न कायमचा सुटणार आहे.ग्रामीण भागाला शहरी भागाशी जोडण्यासाठी आणि ग्रामीण भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्या त्या भागातील दळणवळणाची साधने अधिक सक्षम झाली पाहिजेत. दळणवळणाची साधने सक्षम करण्याच्या अनुषंगाने रस्ते विकासाची बांधणी होणे अत्यावश्यक आहे. हीच बाब लक्षात घेता खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी जिल्ह्यातील ग्रामीण भागाला पक्क्या रस्त्याने जोडण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला आहे. राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत नांदेड जिल्ह्यातील विविध रस्ते विकासासाठी तब्बल 48



कोटी 72 लाख 56 हजार रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे . या कामात नायगाव तालुक्यातील कहाळा -पाटोदा -बरबडा - अंतरगाव - कुंटूर भाग एक अंतर्गत कुंटूर सालेगाव या रस्त्याच्या विकासासाठी सात कोटी रुपये, कंधार तालुक्यातील पेनुर- शेवडी -सोनखेड -कलंबर -बारूळ या रस्त्याचे रुंदीकरण आणि पुलासह बांधकामासाठी सात कोटी पन्नास लाख, अहमदपूर -घोटगा - कुरुळा- कंधार- बारूळ- गडगा या रस्त्याच्या विकासासाठी सोळा कोटी रुपये, नायगाव तालुक्यातील मांडणी -काहळा - बरबडा -अंतरगाव - रुई - कुंटूर -सालेगाव - डोंगरगाव या रस्त्याचे विकासासाठी 11 कोटी रुपये , कंधार तालुक्यातील जिल्हा सीमा कुरुळा- पोखरणी -गवळण -आंबुलगा -बोरी बुद्रुक या रस्त्यासाठी सात कोटी रुपये आणि देगलूर तालुक्यातील हाणेगाव- कर्नाटक राज्य सीमा- रस्त्याची अर्दन शोल्डरसह दुपदरीकरणासाठी 22 कोटी 56 लाख असा एकूण 48 कोटी 72 लाख 56 हजार रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे.

या निधीची तरतूद नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात करण्यात आली असून ही कामे लवकरच सुरू होतील असा विश्वासही खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला आहे . ग्रामीण भागाला शहरीकरणाशी जोडून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी महाराष्ट्रातील भारतीय जनता पार्टी व शिवसेनेचे सरकार काम करते आहे. शिवाय मोदी सरकारच्या नेतृत्वाखालीही ग्रामीण भागाच्या विकासाचे अनेक प्रकल्प राबविण्यात येत आहेत. आगामी काळात नांदेड जिल्ह्यातील अन्य रस्त्याच्या विकास कामासाठी निधी मिळविला जाईल, असा विश्वास खा.चिखलीकर यांनी व्यक्त केला आहे.




# तुम्हाला पंचामृत समजणार तरी कसे ?

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : अर्थसंकल्प एकदा चाळून पहा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : तुमच्या काळात, कोरोनाच्या काळात वेगळेच अमृत चालत होते, त्यामुळे तुम्हाला पंचामृत समजणार तरी कसे? अजितदादा म्हणाले, पुरेशी तरतूद म्हणजे नेमके समजले नाही. हा भाषेतील फरक आहे. तुम्ही परखड त्यामुळे आवश्यक तरतूद शब्द वापरता, मी जरा सौम्य, म्हणून पुरेशी तरतूद शब्द वापरतो... दादा तुमचा 2021-22 चा अर्थसंकल्प एकदा चाळून पहा, असे आवाहन अर्थसंकल्पावरील चर्चेत बोलताना उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

यावेळी पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा असे झाले की विरोधकांना कोणतेही आरोप करण्यासाठी जागा राहिली नाही. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, आरोग्य, रस्ते अशा सर्व क्षेत्रांसाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. सर्व क्षेत्र आणि सर्व घटकांना सामावून घेणारा हा अर्थसंकल्प आहे. तुमचे किमान समान कार्यक्रमाचे आश्वासन आता आठवतात तरी का ? किती आश्वासने महाविकास आघाडीने दिली आणि ती हवेत कशी विरली, याची यादीच माझ्याकडे आहे आणि ती जनतेला सुद्धा ठावूक आहे. विकास दर कोरोनाच्या काळात नकारात्मक झाला होता. उणे 10% वर गेला होता. नंतरच्या काळात तो अचानक वाढला आणि आता तो स्थिरावतो आहे. त्यामुळे विकास दर कमी झाला, असे अजिबात नाही. शेती क्षेत्राचा विकास दर हा सातत्याने दुहेरी अंकात आहे. सेवा आणि उद्योग क्षेत्राचा दर सुद्धा वाढता आहे. जिल्हा विकास योजनांचा, आदिवासी उपयोजना असा सर्व खर्च वाढवत नेला. कुठलीही खर्च कमी केला नाही. अजितदादांनी अर्थसंकल्पीय खर्चाची तुलना सुधारित खर्चाशी केली. त्यामुळे त्यांनी गल्लत केली.

अजितदादा म्हणाले,

**कढी बोलाचीच भात ।जेऊनिया कोण तृप्त झाला ॥**

पण हे महाविकास आघाडीच्या संदर्भात होते.

आमच्या सरकारसंदर्भात ते असे आहे.

**आजि देतो पोटभरी ।पुरें म्हणाल तोवरि ॥**

तुमच्या काळात सर्वात मोठा पक्ष असलेल्या तत्कालिन शिवसेनेला 4,35,691 कोटी रुपयांपैकी केवळ 15 टक्के निधी दिला होता. आता तो 34% आहे. तुम्ही त्यांची कोंडी केली म्हणून तर हा दिवस आला. रामदास आठवलेंच्या शब्दांत सांगायचे तर...

**तुम्ही केली त्यांची कोंडी म्हणून मारली आम्ही मुसंडी....**

मुद्दा 13 : पीककर्जावरील व्याजाची रक्कम : आवश्यक तरतूद करु



मुद्दा 55 : जि.प.शाळांची पुनर्बांधणी : आवश्यक निधी

मुद्दा 90 : महाबळेश्वर, पाचगणी, लोणार सरोवर विकासः आवश्यक निधी

मुद्दा 113 : सेवाग्राम विकास आराखडाः आवश्यक निधी

मुद्दा 123 : तीर्थक्षेत्र विकास : आवश्यक निधी

मुद्दा 124 : नरसी नामदेव क्षेत्र विकासः आवश्यक निधी

मुद्दा 125 : संत बसवेश्वर स्मारक : आवश्यक निधी

मुद्दा 126 : पोहरादेवी विकास : आवश्यक निधी

जीएसटी कमी झाला, असे अनेक सदस्य बोलले. तुम्ही गल्लत केली.

2020-21 : फेब्रुवारीपर्यंत 65,038 कोटी रुपये

2021-22 : फेब्रुवारीपर्यंत 86,478 कोटी रुपये

2022-23 : फेब्रुवारीपर्यंत 1,18,020 कोटी रुपये

देशाचेही चित्र पाहिले तर

**महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर**

दुसरा : गुजरात, तिसरा : कर्नाटक, चौथे : तामिळनाडू पाचवे : उत्तरप्रदेश, सहावे : हरयाणा

तुम्हाला महाराष्ट्र दहाव्या क्रमांकावर कुठे दिसला ?

DPC विनियोग झाला नाही, असे सदस्यांनी सांगितले. मी पण माहिती घेतली... वस्तुस्थिती अशी आहे की, वर्धा, नागपूर, गडचिरोली, भंडारा, अमरावती, अकोला या 6 ही जिल्ह्यात सरासरी 60 ते 70 टक्के खर्च झाला आहे. काल तुम्ही आभास निर्माण केला की, 17-18 टक्क्यांच्या घरात आहे. शेतकऱ्यांना 1 रुपयात पीकविमा दिला, तर तुम्हाला पोटात का दुखते ? तुमच्या काळात शेतकऱ्यांना पीकविमाचे पैसेच मिळाले नाही.

पीकविम्याची स्थिती काय होती ?

वार्षिक सरासरी : 1999 ते 2014 : 25 लाख शेतकरी/578 कोटी 2015 ते 2020 : 1.25 कोटी शेतकरी/2880 कोटी 21 आणि 22 महाविकास आघाडी : 60 लाख/1990 कोटी. पीकविमा कंपन्यांच्या घशात सर्वाधिक निधी गेला तो महाविकास आघाडीच्या काळात.

जुनी पेन्शन योजनाः राज्याचा जीआरः 31 ऑक्टोबर 2005 त्यावेळी राज्यात सरकार होते : काँग्रेस-राष्ट्रवादी मुख्यमंत्री : विलासराव देशमुख, अर्थमंत्री : जयंत पाटील मला दोष द्यायचा नाही. निर्णय विचारपूर्वकच घेतला असेल. आज आम्ही निर्णय घेतला तरी आमच्यावर बोझा नाही. पण राज्य म्हणून विचार करावाच लागेल. आम्ही विरोधात नाही. पण विचार करून निर्णय घ्यावा लागेल. आम्ही कर्मचाऱ्यांच्या विरोधात नाही. आता 3 सदस्यीय समिती आपण गठीत केली आहे.

भुजबळ म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजनेतील 1,17,000 घरांचा निधी परत गेला. दुसऱ्या राज्यांना दिला. पण हे खरे नाही. मला सांगा, तुम्ही युटिलायझेशन सर्टिफिकेट दीड-दीड वर्ष देणार नाहीत, तर मग केंद्र पैसे कसे देणार ? आम्ही युसी पाठविली आणि आता सुमारे 1700 कोटी रुपये आले आहेत. जयंत पाटील म्हणाले मराठा शब्दाचा उल्लेख सुद्धा अर्थसंकल्पात नाही. त्यांनी अर्थसंकल्प वाचायला हवा होता. आम्ही सारथीला निधी दिला. त्याशिवाय सारथीचे नाशिक येथे विभागीय कार्यालय, सुसज्ज अभ्यासिका, मुला-मुलींचे वसतीगृह : 50 कोटी, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळासाठी निधी दिला. छत्रपती संभाजीनगर येथे स्व. गोपीनाथजी मुंडे स्मारक व्हावे म्हणून आम्ही प्रयत्न केले, मंजूर केले, निविदा काढल्या. मधल्या 2.5 वर्षात काहीच झाले नाही. आता झाडे तोडण्याची परवानगी घेण्यात येत आहे. आमच्याच काळात हे काम करणार.

जयंतराव तुम्ही सूर्यकांत डोळस यांच्या मोजक्या दोन वात्रटिका वाचलेल्या दिसतात,

त्यांच्या काही वात्रटिका तुमच्याही काळात आल्या होत्या, त्यातील एक वाचून दाखवितो... दोघांमध्ये तिसरा आला सांगा कोण कुणाचा लव्हर आहे ?

# गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार मंडळाला १३५ कोटी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या महत्वाकांक्षी असलेल्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला राज्य शासनाने १३५ कोटी रुपये निधी देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत अर्थसंकल्पीय चर्चेच्या उत्तरादरम्यान केली आहे. आमदार धनंजय मुंडे यांनी अर्थसंकल्पीय चर्चेत सत्ताधारी पक्षाला स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचा विसर पडल्याचा आरोप करत, लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला अर्थसंकल्पात निधीची तरतूद नसल्याबाबत खंत व्यक्त केली होती. त्याचबरोबर मागील काही वर्षांपूर्वी भाजपचे सरकार सत्तेत असताना छत्रपती संभाजीनगर येथे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मारकाची केलेली घोषणा अपूर्ण असल्यावरून देखील धनंजय मुंडे यांनी प्रश्न उपस्थित केले होते.

अर्थसंकल्पीय चर्चेअंती उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय मुंडे यांच्या या दोन्ही प्रश्नांचे निराकरण केले. ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला १३५



कोटी रुपये निधी जाहीर करण्यात आला असून, प्रचलित नियमानुसार त्याच प्रमाणात कल्याण निधी संकलित केल्यास महामंडळाला एकूण २७० कोटी रुपये निधी मिळणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे स्मारक उभारणीसाठी लागणाऱ्या विविध परवानग्या घेण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून, त्या परवानग्या पूर्ण होताच स्मारक उभारणीचे काम सुरू केले जाईल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील ८ महिन्यापासून ठप्प असलेल्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला निधी देण्याच्या घोषणेचे धनंजय मुंडे यांनी स्वागत करत देवेंद्र फडणवीस व सरकारचे आभार मानले आहेत, त्याचबरोबर महामंडळ व स्मारकाच्या कामाला आता गती मिळावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

# अजितदादांचा पारा चढला

आधुनिक केसरी

महाराष्ट्रातील अर्थसंकल्पीय अधिवेशन चांगलेच गाजत आहे. परवा उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर विरोधकांनी सभागृहात व सभागृहाबाहेर सरकारवर टीकेची झोड उठविली. बुधवारी सभागृहात अनेक मंत्री गैरहजर असल्यामुळे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचा पारा चढला. ते म्हणाले की, सध्या सभागृहात गलिच्छपणाचे कामकाज सुरू आहे. अक्षरशः यांना कुणालाही विधीमंडळाच्या कामकाजात रस नाहीय... यांना बाकीच्याच कामात रस आहे. निर्लज्जपणाचा कळस झाल्यावर आमचा नाईलाज होतो अशा शब्दात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज सभागृहात तीव्र संताप व्यक्त केला. आज सकाळी सभागृहात मंत्री आणि संसदीय कामकाज मंत्री उपस्थित राहिले नसल्याने विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सरकारला अक्षरशः धारेवर धरले. उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्र्यांना रात्री अडीच - तीन वाजेपर्यंत काम करण्याची सवय आहे. त्यामुळे सकाळी अडचण होते हे आम्ही समजू शकतो, आम्ही सहकार्य करायला तयार आहोत. परंतु चंद्रकांत पाटील अडीच - तीन वाजेपर्यंत जागत नाहीत... त्यांनी लवकर उठून आले पाहिजे. शिवाय संबधित जे मंत्री आहेत त्यांनी लवकर आले पाहिजे.. संसदीय कामकाज मंत्री असं काय काम करतात असा सवाल करतानाच संसदीय कामकाज मंत्री यांना जमत नसेल (मला त्यांना कमी लेखायचे नाही) मग त्यांनी थांबू नये अशा स्पष्ट इशाराच अजित पवार यांनी यावेळी दिला. अर्थसंकल्प अधिवेशन किती महत्त्वाचे असते हे उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. आपण अध्यक्ष झाल्यानंतर चांगल्या प्रथा पाडण्याचा प्रयत्न करताय, शिस्त लावण्याचा प्रयत्न करताय, आम्ही विरोधी पक्षाच्यावतीने सहकार्य करत आहोत. अर्थसंकल्पावर चर्चा करत असताना रात्री दहा वाजेपर्यंत कामकाज घ्या अशी विनंती केली त्याला मान्यता दिली. परंतु रात्री एक वाजेपर्यंत कामकाज चालले. त्या चर्चेला मंत्री हजर नव्हते याकडे अजित पवार यांनी लक्ष वेधले. ज्यांना बाहेर जायचे आहे, एखादा मंत्री बाहेर गेला तर कामकाज थांबवावे लागते, तरीही आम्ही समजून घेतले. मंत्री वॉशरुमला, चहा प्यायला गेले असतील. आम्ही जेव्हा सभागृहात असायचो त्यावेळी सकाळी नऊ वाजता हजर असायचो. राज्याचा उपमुख्यमंत्री म्हणून फुशारकी सांगत नाही असेही अजित पवार म्हणाले. गेली ३०-३२ वर्ष या सभागृहाची परंपरा कशी चालत आली आहे. आपण कशी राखली पाहिजे व नंतरच्या लोकांनीही राखली पाहिजे. या विधीमंडळाकडे संपूर्ण महाराष्ट्र बघत असतो. आज सकाळी साडे नऊला कामकाज सुरू झाले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना जास्त व्याप असतो याची जाणीव आहे. परंतु ते नसले तरी संसदीय कार्यमंत्री तरी किमान साडे नऊला येऊन बसले पाहिजेत. चंद्रकांत पाटील यांच्यावर आमचा आरोप नाही परंतु त्यांनी जबाबदारी घेतली तर येऊन बसा ना बाबा अशा शब्दात अजित पवार यांनी खडसावले. आज सभागृहात मंगलप्रभात लोढा यांची एक लक्षवेधी झाली सहा मंत्री गैरहजर... अध्यक्ष महोदय यांना 'जनाची नाही मनाची तरी वाटत नाही का?' ... मला वाईट वाटते असे शब्द वापरायला असेही अजित पवार म्हणाले. एक दीड वाजेपर्यंत सदस्य बसले आणि सकाळी साडे नऊला दोन्ही बाजूचे सदस्य लक्षवेधी होते ते आले. आणि मंत्रीच नाहीत. असे काय काम मंत्र्यांना आहे असा संतप्त सवाल अजित पवार यांनी करतानाच अहो तुम्हाला मंत्री करत असताना मागे - मागे पळत असता... मी बोलत नाही सकाळी कालिदास कोळंबकर यांनी तुम्ही मंत्री होण्यासाठी आणि मंत्री करा सांगण्यासाठी पुढे- पुढे जाता असे सांगितल्याचे अजित पवार म्हणाले. मंत्री झाल्यावर सभागृहाची जी परंपरा आहे, जी कामे आहेत ती तुमच्यावर वैधानिक काम दिले आहे. अध्यक्ष महोदय तुम्हालाही ती गोष्ट आवडली नाही असे तालिका अध्यक्ष संजय शिरसाट यांनी सांगितले. देवेंद्र आम्ही तुम्हाला सिन्सियर म्हणून बघतो तुम्ही त्याठिकाणी उच्चविद्याविभुषित अशी तुम्हाला नावे दिली आहेत. पण तुमचेही लक्ष नाही. तुम्ही तुमच्या काही मंत्र्यांना सांगा अशा शब्दात अजित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला.

# सरकारने एकदा तरी बोलावे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**गेल्या नऊ वर्षापासून देशातील राजकीय व सामाजिक वातावरण खूप बदलले आहे. याचा अर्थ असा नाही तर नऊ वर्षा अगोदर देश महासत्ता होता, परंतु अगोदरची जी परिस्थिती होती त्या परिस्थितीपेक्षा कितीतरी पटीने धोक्याची परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. सध्या सत्तेत असलेले देशाचे प्रधानमंत्री यांचे नऊ वर्ष अगोदरचे जर व्हिडिओ बघितले तर रोजगार, महागाई आणि रुपयाची घसरण यावर आधारित होते. परंतु त्यावेळेस त्यांचे सरकार नव्हते आज त्यांचे सरकार आहे पण रोजगार, महागाई, शिक्षण, रुपयाची घसरण यावर बोलायला मात्र कोणी तयार नाही पत्रकार परिषदा ठेवून पत्रकारांना उत्तरे देणे तर सोडाच.**

बहुतांश इलेक्ट्रॉनिक्स मीडिया हा सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहूले बनला आहे आणि अनेक स्वायत्त संस्था सरकारच्या मर्जीनुसार काम करत आहेत आणि म्हणूनच फक्त विरोधकांची चौकशी, विरोधकांनाच अटक होत असल्याचे संपूर्ण देश बघत आहे. देशाचे राजकारण हा जनतेचा विकास व देशहीत यावर आधारित असायला पाहिजे. परंतु आजची परिस्थिती जर बघितली तर देशाचे राजकारण हे द्वेषाचे धर्माचे व सूड बुद्धीचे होताना दिसत आहे. प्रामाणिक व विकासाचे राजकारण हळूहळू देशातून लोप पावत चालले आहे. राजकारणामधली वैचारिकता ही लयास गेलेली आहे. देशामध्ये अराजकता व हुकूमशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशामध्ये लोकशाही विरोधी कामे होऊन लोकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकांना अभिव्यक्त होण्यापासून थांबवले जात आहे, आणि हेच देशाच्या विकासाला व लोकशाहीला घातक आहे देशाचे प्रधानमंत्री यांचे नऊ वर्ष अगोदर चे व्हिडिओ आपण शेयर जरी केले तरी त्याला देशद्रोही समजण्यात येते, सत्त्य परिस्थिती वरती प्रश्न विचारणे देशद्रोह समजण्यात येत आहे, लोकांच्या हक्क अधिकाऱ्यावरती बोलणे देशद्रोह समजण्यात येत आहे, शिक्षण, रोजगार, महागाई, आरोग्य सुविधा यावर बोलण्याचे बंद झालेले आहे. आज एकंदरीत विचार केला तर फक्त सत्ताधारी लोकांचे समर्थन करणे व त्यांचे विरोधात एकही शब्द न बोलणे यालाच देशप्रेम म्हटले जाऊ लागले आहे. सरकारने समोर येऊन एकदा तरी कॉँग्रेस, हिंदू- मुस्लिम, गाय, धर्म हे सोडून विकास, रोजगार, शिक्षण यावर बोलावे. परंतु सरकार या विषयावर कधी बोलत नाही. आणि एखाद्या वेळेस विरोधी पक्षांनी जर प्रश्न विचारलाच तर हे मागच्या सरकारने केले, ते कॉँग्रेस मुळे झाले, अशा पद्धतीची निरर्थक उत्तरे देऊन विषयाला डावलले जाते. ठीक आहे कॉँग्रेसने काही केले नाही म्हणून तुम्हाला सत्तेत बसवले. मग तुम्ही सत्तेत आल्याच्या नंतर तुम्ही काय काय कामे केलेत ही स्पष्टपणे सांगण्याची हिंमत मात्र करत नाहीत. मै देश नही बिकने दूंगा असं म्हणत म्हणत देशाला कर्जबाजारी करून ठेवले आणि दानी सारख्या उद्योगपतींना जगातील श्रीमंत. दरवर्षी लाखो करोडो रुपयांचे बजेट निघते या बजेटचा पैसा नेमका जातो कुठे कारण शेतकरी, विद्यार्थी, गृहिणी, कर्मचारी, निवृत्त कर्मचारी सर्वजण सरकारच्या ध्येय धोरणाला व महागाईला कंटाळले आहेत मग बजेट मधला पैसा नेमका खर्च होतो तरी कुठे ? हा प्रश्नच आहे. 2014 पासून एकूण किती शिक्षण संस्था सुरू झाल्यात ? किती नोकर भरती केली ? किती आरोग्याच्या सुविधा वाढविल्या ? किती आरोग्य सुविधेचे नूतनीकरण केले ? किती किती विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत केली ? या सर्व बाबींवर सरकारने बोलणे आवश्यक आहे. आजच्या सरकारचा विचार केला तर हे सरकार माणुसकी आणि धर्म या दोन्ही तत्त्वाच्या विरुद्ध जाऊन काम करत आहे. माणुसकी शिकवते माणसाने माणसासारखे माणसासोबत राहावे, परंतु सध्या सरकार जातीय द्वेष, तेढ निर्माण करून



माणसाला माणसापासून दूर करत आहे. राहला प्रश्न धर्माचा तर भ्रष्ट लोकांना पक्षात प्रवेश करून ते प्रामाणिक आहेत असे धादांत खोटे बोलणे कोणत्या धर्मात येते ? आजची परिस्थिती पाहता अनेक भ्रष्ट नेत्यांची यादी या सरकारने वाचून दाखवलेली होती। परंतु ज्या ज्या भ्रष्ट नेत्यांनी सत्ताधारी पक्षात प्रवेश केला नंतर ते मात्र नितीवान आणि प्रामाणिक झालेत. ज्यांना ईडीच्या नोटीसा गेल्या होत्या त्यांनी जेव्हा पक्ष प्रवेश केला तेव्हा ईडीची चौकशी देखील झाली नाही. अनेक बलात्काराचे आरोप असलेले नेते हे सत्ताधारी पक्षात आहेत. माणुसकीचं सोडा ज्या धर्माच्या नावावर ती राजकारण करतात त्या धर्माला तरी ह्या गोष्टी मान्य आहेत का ? याचा थोडाही विचार न करता माणुसकीला काळीमा फसून आणि धर्माचा व्यापार करून येथे राजकारण केले जात आहे. माणूस जन्माला आल्यानंतर त्याला मरण येणार हे अटळ सत्य आहे प्रत्येकाचा इतिहास लिहिला जाणार हे सुद्धा अटळ सत्य आहे मरताना माणूस काहीही घेऊन जात नाही हे सुद्धा अटळ सत्य आहे, आणि सर्व मान्य आहे. तरीही समाजामध्ये द्वेष निर्माण करणे समाजाची व देशाची आर्थिक लूट करून स्वतःचे घर भरणे, आणि त्यानंतर बदनाम होणे ही शिकवण माणुसकीची आहे की धर्माची ? आणि जर दोन्हीही गोष्टीची नसेल तर एवढा खटाटोप कशासाठी ? तेच जनतेचे जर कामे केलेत देशाचे सर हित बघितलेत तर अजरामर होऊन एक सोनेरी इतिहास लिहिल्या जाऊन लोक मरणानंतर सुद्धा सन्मान करतात. एवढी साधी गोष्ट ही लोभ स्वार्थ यामुळे लोकांना कळत नाही. आणि म्हणून वाटेल, त्या मार्गाने वाटेल तेवढे पैसे कमावून संपत्ती मिळवण्यात ते धन्यवाद आहेत. परंतु जेव्हा सरकार चालवायचे असते तेव्हा रोजगार शिक्षण आरोग्य महागाई या गोष्टीवरती काम करणे गरजेचे असते आणि या गोष्टीवरती काम न करता या गोष्टीवरती कुठेही न बोलता आणि सर्वसामान्य नागरिक यावरती बोललेत तर त्यांना देशद्रोही म्हणून, कोणी आंदोलन केले तर त्यांना चुकीचे समजून त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. ज्यांच्यावर बलात्कार, भ्रष्टाचारांचे आरोप आहेत त्यांना मात्र माना सन्मानाच्या खुर्च्या दिल्या जातात. थोडक्यात काय या देशात नेमकं चाललय काय, आणि सरकारकडे थोडा तरी प्रामाणिकपणा थोडी तरी माणुसकी असेल तर त्यांनी बाकी सर्व गोष्टी बाजूला ठेवून आणि फक्त नऊ वर्षा मधील शिक्षण, रोजगार, महागाई, आरोग्य सुविधा यावरती बोलून त्याचा लेखाजोखा द्यावा. अगोदर च्या सरकारमध्ये किती नोकरदार होते आणि नऊ वर्षात किती ची भर पडली ? अगोदर किती शाळा महाविद्यालय होते आणि नऊ वर्षात नवीन किती सुरू केले ? पुर्वी किती दवाखाने होते आज किती नवीन झाले ? पुर्वी रुपया का घसरत होता, आणि आपल्या काळात ऐतिहासिक घसरण का झाली ? याचे परिस्थिती नुसार कारणे वेगळी असु शकतील पण ते प्रामाणिक पणे मांडणे आवश्यक आहे आणि ते मांडायला पाहिजे. अगोदर क्रुड ऑईल काय भाव होते तेव्हा पेट्रोल काय भाव विकल्या जायचे, आज क्रुड ऑईल काय भाव आहे पेट्रोल काय भावात विकले जायचे याचा तुलनात्मक लेखाजोखा सरकार का देत नसेल. सरकारने द्यायलाच पाहिजे. तरच लोकांना सरकारचे काम दिसतील. अगोदर सरकारच्या मालकीचे काय काय होते आणि आज काय काय आहे त्यात किती पटीने वा टक्क्यांनी वाढ झाली याची माहिती सार्वजनिक करणे आवश्यक आहे. सरकार हल्ली यावर बोलत नाही. इलेक्ट्रॉनिक मिडिया सरकारचा आवाज जनते पर्यंत पोहचवते परंतु जनतेचा आवाज सरकार पर्यंत पोहचवत नाही. जेव्हा इलेक्ट्रॉनिक मिडिया चा इतिहास लिहला जाईल तेव्हा खरचं इतिहासावर मिडीयाला गर्व असेल का ? मिडिया सोबतच इतर स्वायत्त संस्था ज्या सरकारच्या इशाऱ्यावर काम करतात त्यांना मानसिक सुख मिळत असेल का ? अनेक उच्च पदस्थ लोक राजीनामा देऊन काम सोडत आहेत. त्यांचा तो स्वाभीमान आहे. परंतु जे स्वाभिमान गहान टाकुन काम करतात त्यांना जिवनातील सुख व माणसिक समाधान मिळते काय ? आपली जबाबदारी विसरून सत्ताधारी लोकांची हुजरेगिरी करण्यात धन्यता माणणारे आणि गोरगरीब जनतेला वेठीस धरणारे लोक खरचं आयुष्यात यशस्वी होणार का ? असे अनेक प्रश्न असले तरी सत्ताधारी सरकारने ने समोर येऊन शिक्षण, आरोग्य, रोजगार महागाई यावर तर बोलायलाच पाहिजे परंतु मिडिया आणि इतर स्वायत्त संस्था यावर सरकारचा दबाव नाही, ते स्वतः व निष्पक्ष काम करतात याची उदाहरणे सादर करावी. या गोष्टीवर बोलावे. आणि वरिल गोष्टीवर बोलता येत नसेल तर सत्तेत बसु नये. वरिल गोष्टीवर न बोलता सत्तेत बसण्याचा काहीच अर्थ नाही. म्हणून सरकारने बोलले एकदा तरी या मुद्यावर बोलले पाहिजे. नाहीतर आम्हाला देश चालवणे जमत नाही असे सांगून बाजूला व्हायला पाहिजे.

# मराठी भाषा विद्यापीठ एक स्तुत्य निर्णय




डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारतातील वेगवेगळ्या राज्यांत त्या-त्या भाषेचे संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठांची स्थापना झाली. त्याच प्रकारे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यातयेत होती. मराठी विद्यापीठाची सर्वप्रथम कल्पना १९३३ साली नागपुरात झालेल्या मराठी साहित्य संमेलनात मांडण्यात आली. रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करावे, ही मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. ती अखेर पूर्ण झाली आहे. मराठी भाषेतील आद्यग्रंथ ज्या ठिकाणी लिहिला, ते वाजेश्वरी स्थान रिद्धपुरात आहे. चांदूर बाजारपासून मोर्शी मार्गावर नऊ किलोमीटरवर रिद्धपूर आहे.**

महानुभाव संप्रदायाचे रिद्धपूर तीर्थस्थान आहे. मराठी भाषेची सद्यःस्थिती, मराठी भाषाविषयक धोरणाची उद्दिष्टे यावर भाषेचे २५ वर्षांचे धोरण निश्चित करण्याचे प्रयत्न काही वर्षांपूर्वी शासन स्तरावरून सुरू करण्यात आले होते. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखालील भाषा सल्लागार समितीने मराठी भाषा विकासाचे धोरण ( मसुदा २०१४ ) राज्यासमोर ठेवले. २५ वर्षांसाठी मराठी भाषेचे धोरण निश्चित करताना मराठी भाषा विद्यापीठाची आवश्यकता असल्याचे प्रस्तावित मसुद्यात नमूद करण्यात आले होते. हिंदी भाषेचा विकास व्हावा म्हणून महाराष्ट्रात वर्धा येथे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली. सरकारने रामटेक येथे संस्कृत भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले आहे. भारतातील वेगवेगळ्या राज्यांत त्या-त्या भाषेचे संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठांची स्थापना झाली. त्याच प्रकारे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. स्वातंत्र्योत्तर काळात पुणे विद्यापीठ स्थापन झाले, तेव्हा हे विद्यापीठ मराठी विद्यापीठ व्हावे, अशी भावना इतिहास संशोधक, लेखक व या विद्यापीठाचे कुलगुरू दत्तो वामन पोतदार व इतरांनीही व्यक्त केली. 'मराठी विश्वकोश मंडळा'ची निर्मिती हे मराठीला ज्ञानभाषा करण्यासाठी उचललेले पहिले पाऊल होते. पण त्यानंतर मराठीच्या विकासासाठी दुसरे पाऊल दुर्दैवाने कोणत्याही सरकारने टाकले नाही. मात्र शिंदे फडणवीस सरकारनेरिद्धपूरचे हे महत्व लक्षात घेऊन या ठिकाणी मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूरहे महानुभाव पंथाचे प्रमुख केंद्र असून मराठी



साहित्याच्या विकासात त्याचं महत्त्वाचं योगदान आहे. रिद्धपूरचं हे महत्व लक्षात घेऊन त्या ठिकाणी मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यात येणार असल्याची महत्त्वाची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली. मराठी भाषेतील आद्य साहित्यिक अशी ओळख असलेल्या चक्रधर स्वामींच्या नावानं रिद्धपूर या ठिकाणी मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केली. या ठिकाणी मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करावं ही मागणी अनेक वर्षापासून करण्यात येत होती. महानुभाव संप्रदायाचे साहित्याला योगदान मराठीतील पहिला आद्यग्रंथ म्हणून ओळख असलेला लीळाचरित्र हा ग्रंथ रिद्धपूरमध्ये उदयास आला. म्हाइंभटानी तो वाजेश्वरी या ठिकाणी लिहिला असल्याची नोंद आहे. मराठी साहित्याला महानुभाव पंथीयांचा मोठा वारसा लाभला असून महानुभाव पंथाशी संबंधित जवळपास ३० हजार ग्रंथ असल्याची नोंद आहे. रिद्धपुर हे अमरावती जिल्ह्यात असून श्रीक्षेत्र रिद्धपूर ही महानुभावपंथांचीच नव्हे, तर मराठी वाङ्मयाचीसुद्धा काशी म्हणून ओळखली जाते. या भूमिमध्ये मराठीतील पहिला हस्तलिखित आद्यग्रंथ ‘लीळाचरित्र’ लिहिला गेला. याठिकाणी लीळाचरित्रासह स्मृतिस्थळ, गोविंदप्रभू चरित्र, दृष्टांतपाठ, सूत्रपाठ, मूर्तीप्रकारासारखे ग्रंथ लिहिले गेले.त्याचप्रमाणे सहा हजारहून अधिक ग्रंथ या ठिकाणी लिहले गेल्याने या भूमीला विशेष महत्व आहे. रिद्धपुर हे श्री गोविंदप्रभू, चक्रधर स्वामी, श्री नागदेवाचार्य यांच्यासारख्या महापुरुषांनी वास्तव्य केलेली भूमी आहे. माहीम भट्ट, केशीराज व्यास, महदाईसा यांच्यासारख्या प्रज्ञावंतांनी याच ठिकाणी मराठी भाषेला झळाळी दिली. समतेचा विचार १३ व्या शतकात याच मातीत जन्मलेल्या गोविंदप्रभुंनी मांडला. चक्रधरांना हिंदू धर्मातील अस्पृश्यता, स्त्री दास्य, मांसाहार यासारख्या गोष्टी मान्य नव्हत्या. आचारधर्माचा आत्मा होऊन बसलेली मूल्ये त्यांना मान्य नसल्यामुळे श्री चक्रधरांनी महानुभाव पंथाची स्थापना रिद्धपुरमध्ये केल्याचे अनुयायी सांगतात. मराठीही राज्याची राजभाषा होऊन अर्धशतकावर कालावधी झाला, भाषेचे विद्यापीठ स्थापन केले नाही. ही उणीव भरून काढणे व मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे देखील आता रास्त होणार आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भाजपच्या सत्तेतून हकालपट्टीची सुरुवात महाराष्ट्रातूनच

## नाना पटोले : महाविकास आघाडीच्या संयुक्त बैठकीत आखली रननीती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष सत्तेच्या जोरावर संविधान आणि लोकशाही व्यवस्था मोडीत काढण्याचे काम करत आहे. आज देश मोठ्या अपेक्षेने महाराष्ट्राकडे पहात असून महाराष्ट्राच्या जनतेवर देशाची भिस्त आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्राने कायमच देशाला दिली आहे. आता पुन्हा तेच काम होणार आहे. भाजपला सत्तेतून हाकलून देण्याच्या प्रक्रियेची सुरुवात महाराष्ट्रातूनच होईल, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीची संयुक्त बैठक आज यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पार पडली. या बैठकीला शिवसेना पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मंत्री छगन भुजबळ, शेकापचे नेते जयंत पाटील, एकनाथ खडसे, अनिल देशमुख, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, सतेज पाटील, आदित्य ठाकरे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, सरचिटणीस प्रमोद मोरे, देवानंद पवार यांच्यासह तिन्ही पक्षाचे आमदार, खासदार, जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

नाना पटोले पुढे म्हणाले की, सत्तेत जाण्यासाठी नाही तर देशातील लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी महाविकास आघाडी एकत्र आहे. राज्यातील सर्व महसुली विभागात महाविकास आघाडीच्या सभा घेण्याचा निर्णय झालेला आहे. मविआच्या या सर्व सभा अतिभव्य झाल्या पाहिजेत. तालुका, जिल्हा पातळीवर सभेची तयारी जोरात करून या सभा यशस्वी करा असे आवाहन पटोले यांनी केले.

यावेळी बोलताना काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, मविआचे सरकार चांगले काम करत असताना ते सरकार पाडले. पण आज राज्यातील परिस्थिती मविआच्या बाजूने आहे. विधान परिषदेच्या निवडणुका मविआने जिंकल्या, कसबा पोटनिवडणुकही मोठा विजय मिळवलेला आहे. मी राज्याचा दौरा करत असताना अनेकदा पाहिले की ग्रामीण भागात भाजपा कुठेही नाही. ग्रामीण भाग हा भाजपाच्या अजेंड्यात नाहीच आता ते प्रयत्न करत आहेत. पण मविआने एकत्र निवडणुका लढवल्या तर लोकसभेला ३८ जागा जिंकू शकतो ही परिस्थिती आहे तसेच विधानसभेला १८० जागा जिंकू शकतो. राज्यातील जनतेला मविआचेच सरकार हवे आहे त्यामुळे तिन्ही पक्षाच्या संघटीत ताकदीवर पुन्हा एकदा महाविकास आघाडीच सत्तेवर येणार हा विश्वास आहे. आघाडीचे सरकार राज्यात सत्तेत येण्यासाठी आदरणीय सोनियाजी गांधी, शरद पवार व उद्धव ठाकरे यांचा महत्वाचा पुढाकार होता. अडीच वर्ष मविआ सरकारने उल्लेखनीय काम केले. सरकार आल्याबरोबर कोरोनाचे संकट आले, खूप अडथळे आले पण त्याकाळातही विकासकामे थांबू दिली नाहीत. कठीण परिस्थितीत उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामाचे जगाने कौतुक केले. गंगेत प्रेतं वाहून जात असताना महाराष्ट्राने मात्र अशी वाईट अवस्था येऊ दिली नाही.



माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यावेळी म्हणाले की, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना एकत्र असल्याने महाराष्ट्रात एकोप्याचे वातावरण निर्माण झालेले आहे. मविआचे सरकार असताना उद्धव ठाकरे यांनी सर्व पक्षांना सन्मानाची वागणूक दिली. आम्ही मनापासून एकत्र येऊन सरकार स्थापन केले होते. महाविकास आघाडीचे सरकार जसे होते तसेच स्थानिक पातळीवरही महाविकास आघाडी असली पाहिजे अशी लोकांची इच्छा आहे. तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन देशातील लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी एकत्र आले पाहिजे. सध्या राजकारण ज्या पद्धतीने चालले आहे ते लोकांना पटत नाही. सध्याचे सरकार शत्रुत्वाची भूमिका घेऊन वागत आहे, हे चित्र बदलायचे असेल तर तिन्ही पक्षाने एकत्र आले पाहिजे, यश मिळवायचे असेल तर आपल्याला तालुका, जिल्हा पातळीवर एकत्र आले पाहिजे ते काम आपल्याला करावयाचे आहे.

# पोलिसांनाच संरक्षण देण्याची वेळ

## सरकारने जरब बसवावी : पवार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यातील नागरिकांच्या संरक्षणासाठी पोलीस चोवीस तास कार्यरत असतात. अनेकवेळा जिवाची पर्वा न करता ते आपले कर्तव्य बजावत असतात. मात्र कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावरच हल्ले होत आहेत. गेल्या तीन महिन्यात ३० हून अधिक हल्ले पोलिसांवर झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पोलिसांवर हल्ल्याची प्रवृत्ती बळावू नये म्हणून असे गुन्हे करणाऱ्यांवर न्यायालयात त्वरित दोषारोपपत्र दाखल करण्याची आवश्यकता आहे. या हल्ल्यांमुळे पोलिसांचे मनोधैर्य खच्ची होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर सरकारने जरब बसविण्याची मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली. राज्यात पोलिसांवर हल्ले होण्याचे प्रमाण वाढले आहेत. अंगावर थेट गाडी चढवणे, गाडीसोबत फरफटत नेणे, लोकांनी पोलिसांच्या अंगावर धावून जाणे अशा घटनात वाढ झालेली आहे. एकंदरीतच राज्यात पोलिसांवर वेगवेगळया ठिकाणी हल्ला होण्याच्या घटना वाढत असून नागरिकांच्या संरक्षणासाठी २४ तास कार्यरत असणाऱ्या पोलिसांनाही संरक्षण, संपर्कासाठी वॉकी टॉकी, मोटारसायकल इत्यादी गोष्टी पुरविण्याची आवश्यकता आहे. पोलिसांवर हल्ल्याची प्रवृत्ती वाढू नये म्हणून असे गुन्हे करणाऱ्यावर न्यायालयात त्वरित दोषारोपपत्र दाखल करण्याची आवश्यकता आहे. दोषींवर त्वरित कार्यवाही होण्यासाठी आणि पोलीसांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी आणि असे हल्ले होऊ नये यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणीही अजित पवार यांनी केली.

# 'लोककला हे आपले जीवन आहे'

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोककला हे आपले जीवन आहे. जीवनात जोपर्यंत रस नाही तोपर्यंत त्याचा आनंद घेता येत नाही. मात्र पाचव्या अखिल भारतीय महिला लोककला संमेलनाच्या निमित्ताने आपल्याला देशातील विविध लोककलांचा आस्वाद घेता येणार आहे, असे प्रतिपादन उद्योग, पर्यटन, महिला व बाल विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.

संगीत, नाटक अकादमी व पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी च्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रविंद्र नाट्य मंदिर प्रभादेवी येथे आयोजित पाचव्या अखिल भारतीय महिला लोककला संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शालेय शिक्षण तथा मराठी भाषा मंत्री दिपक केसरकर, संगीत, नाटक अकादमी तथा W20 च्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा, पू. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी चे प्रकल्प संचालक संतोष रोकडे, शाहीर अमर शेख अध्यासन चे प्रमुख तथा लोककलेचे गाढे अभ्यासक डॉ. प्रकाश खांडगे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मंगल प्रभात लोढा म्हणाले की, महिला दिनाच्या निमित्ताने आज या संमेलनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव होत आहे ही आनंदाची बाब आहे. हा महाराष्ट्राच्या स्त्री शक्तीचा गौरव आहे. आपल्या देशाची संस्कृती आपला प्राण आहे. आणि ही संस्कृती विविध लोककला आणि लोककलावंतानी टिकवली आहे. लोक सहभागाशिवाय कुठल्याही कार्यक्रमाला शोभा येत नाही. त्यामुळे आपला सहभाग ही तितकाच महत्त्वाचा आहे. या देशातील लोककलेचे जतन व संवर्धन होण्यासाठी आपण सामूहिक प्रयत्न करू असे ते म्हणाले. महाराष्ट्र ही सांस्कृतिक विचारधारेची क्रांतिकारी भूमी आहे.अशा या प्रागतिक महाराष्ट्रात सातत्याने महिलांची प्रगती होत राहो.



यंदाच्या महिला आर्थिक धोरणामध्ये अखिल भारतीय महिला लोककला संमेलन व महिला लोकवंतांसाठी भरीव आर्थिक तरतूद करावी. अशी मागणी शाहीर अमरशेख अध्यासन चे प्रमुख डॉ. प्रकाश खांडगे यांनी दोन्ही मंत्री महोदयांकडे केली. संतोष रोकडे यांनी प्रास्ताविक केले. मृण्मयी भजक यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश खांडगे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमी चे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे, ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक राज दत्त, लेखिका प्राचार्य डॉ. दिपा ताई क्षिरसागर, लावणी कलावंत प्रमिला लोदगेकर, मंजिरी मराठे यांच्यासह साहित्य व लोककला क्षेत्रातील अनेक मान्यवर व प्रेक्षक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. प्रारंभी महाराष्ट्राचे राज्यगीत सादर झाले. ढोल ताशांच्या गजरात पारंपरिक पद्धतीने मंत्री महोदयांच्या स्वागत करण्यात आले. पहिल्या सत्रामध्ये भारतीय संत कवयत्रींचे योगदान परिसंवाद झाला. डॉ. दिपा क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात डॉ. रवींद्र बेम्बरे, डॉ. रवींद्र शिर्के, डॉ. रंजना हरिष, डॉ. विरल शुक्ला यांनी आपला सहभाग नोंदवला. तर दुसऱ्या सत्रात चित्रपटातील स्त्रीभिमुख लोक प्रदर्शन कला या विषयावर परिसंवाद झाला. ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक राज दत्त यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात डॉ. प्रकाश खांडगे, प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे, सिने नृत्य दिग्दर्शिका सोनिया परचुरे, नृत्य दिग्दर्शक सुभाष नकाशे यांनी आपला सहभाग नोंदविला.

महाराष्ट्र Business Katta












# भेदाधिष्ठित शोषणाचे षड्यंत्र उजागर करणारा कवितासंग्रह- 'गनीम'

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ९

**जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ व डॉ.आंबेडकर वेलफेअर असोसिएशन, मलेशिया यांच्या वतीने मलेशियाची राजधानी क्लालालंपूर येथे मागील महिन्यात ४ व ५ फेब्रुवारी २०२३ रोजी दुसरे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन पार पडले. या आंतरराष्ट्रीय संमेलनाचे अध्यक्ष होण्याचा बहुमान ज्यांना मिळाला ते सुप्रसिद्ध कवी, लेखक, विचारवंत, प्रा.डॉ.उत्तम अंभोरे.**

**प्रा.डॉ.उत्तम अंभोरे यांचा स्वभाव विशेष म्हणजे.. विविध सामाजिक कार्यक्रमाला व विद्यार्थ्यांना मदत करणारा सहकारी वृत्तीचा प्राध्यापक, कार्यकर्ता. सर्वांना हसतमुखाने संवाद करणारा मित्र, कोणताही अभिनिवेश न ठेवता मित्रांना कडकडून मिठी मारणारा जिवलग दोस्त..! डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाची प्रमुखपदाची जबाबदारी चोख पार पाडून कार्यालयीन कामकाजातून मुक्त झालेले हे निवृत्तीनाथ आता लेखन व व्याख्याने करायला मोकळे झाले आहेत. वयाची साठी पार करत असतानाही मुखावर तेच तेज, तेच हास्य, तीच दिलखुलास आणि स्वाभिमानी वृत्ती, आंबेडकरी चळवळीशी तीच बांधिलकी, तीच सहकार्याची भावना असणारे आमचे ज्येष्ठस्नेही प्रा.डॉ.उत्तम अंभोरे सर..** यांचे जेवढे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे.. तेवढीच त्यांची मराठी भाषेवरही हुकुमत आहे. त्यांच्या एकूण स्वभावाविषयी बरंच काही सांगण्यासारखं आहे; परंतु त्यांना इथल्या व्यवस्थेबद्दल काय वाटते. इथल्या विषमतावादी व्यवस्थेने निर्माण केलेल्या पीडित, दुर्बल, गरीब, वंचित समुहाच्या अनेक प्रश्नांची धुमस डॉ.अंभोरे यांच्या कवितेत आली आहे, व्यवस्था परिवर्तनाच्या चळवळीत डॉ.उत्तम अंभोरे यांच्या कवितेने आंबेडकरवादी विचारधारेच्या समुहाला सावध करण्याचा जो पावित्रा घेतलेला आहे.. तो मला प्रत्ययकारी आणि मोलाचा वाटलेला आहे...म्हणूनच त्यांच्या कवितेवरचा हा सविस्तार लेखन प्रपंच..!

'गनीम' हा कवी डॉ.उत्तम अंभोरे यांचा तिसरा कवितासंग्रह होय..! या संग्रहापूर्वी त्यांचे 'धगीवरची अक्षरं' व 'पत्ता बदलत जाणारा गनीम' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. 'गनीम' हे या संग्रहाचे अत्यंत सूचक असे नामाभिधान असून एकूण कवितांचा मथितार्थ या शीर्षकातच दडलेला आहे. शोषणाची विविध रूपे उलगडताना असे सिद्ध होते की, विषमतावादाच्या मुळाशी अनाकलनीय, अदृश्य आणि अनभिज्ञ अशी विकृत स्वरुपाची व्यवस्था आहे, जी इथल्या सकल याती बांधवांना पारंपारिक शोषणाच्या जोखडातून सुटू देत नाही. अदृश्य रूपाने शोषण करणारा 'गनीम' आपले स्वरुप बदलत जातो. त्याची ती कूटनीती सोशिकांच्या लक्षात येत नाही, तो आपले काम अगदी रंग,रुप,आकार, बदलून साळसूदपणे करत राहतो. पारंपारिक धर्मकारणाची जी विषमताधिष्ठित वर्णशृंखला आहे तिच्यावरच आधारित वर्गशृंखला आहे. जी प्रत्येक जात समुहाला आपापल्या समुहातून बाहेर पडू देत नाही. दैन्य, दारिद्र्य, जातीभेद टिकून कसे राहतील यासाठी हा 'गनीम' विविध रुपे धारण करत असतो. कवीला या गनीमाच्या अनेक रुपांचं झालेलं आकलन आणि संशोधन प्रस्तुत संग्रहात प्रकर्षाने नोंदवलेलं आहे ; मात्र असं आकलन वंचित,पीडित,अज्ञानी, दरिद्री समुहाला झालेलं नाही. किंबहुना ते उच्चशिक्षित, उच्चविद्याविभूषितांनाही झालेलं नाही, इतकेच नव्हे; तर या समुहातील स्वार्थी पुढाऱ्यांनासुद्धा झालेलं नाही. याचे कारण यातील काही समुह मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठीच कष्टत असतो, तर काही समुह फक्त आपल्या स्वार्थीपणाच्या गर्तेतून बाहेर पडत नाही. कविने स्वतःच्या संशोधनातून गनिमाची ओळख पटवून घेतलेली आहे. त्याच गनीमाची ओळख सर्वसामान्य जनतेला व्हावी आणि समग्र समाज या अदृश्य, बहुरुपी गनीमापासून सावध व्हावा. हाच एक उद्देश कवीच्या काव्यनिर्मितीच्यामागे दिसून येतो.

समाजव्यवस्थेच्या मूलभूत संकल्पनांचा कार्यकारणभाव आणि वर्चस्वासाठी वर्णवादाची व वर्गवादाची संकल्पना निर्माण करणारा व ती शतकानुशतके टिकवून ठेवणारा मार्ग म्हणजे देव, धर्म, दैव, कर्मकांड होय !

उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ आदी भेदाभेदांची ही जी निर्मिती आहे... ती एका विशिष्ट समुहाचे श्रेष्ठत्व टिकवून ठेवण्यासाठीची आहे. म्हणून एका समुहाची श्रीमंती व श्रेष्ठत्व टिकवून ठेवण्यासाठी इतर समुहात भेदाभेद उभे करण्याचे विकृत षडयंत्र चालूच असते. जो तो समुह आपापल्या समुहात राहून जातीयद्वेषात निरंतर कसा अडकून पडेल व त्यातून एकाच समुहाचे श्रेष्ठत्व कसे अबाधित राहील ही अनभिज्ञ खेळी कैक शतकांपासून सुरू आहे. या खेळीच्या विषारी षडयंत्राचे वेगवेगळे पैलू आहेत. त्या पैलूंची सहज उकल होत नाही; म्हणून कवीने त्या पैलूंना 'गनीम' असे नाव दिले आहे; कारण त्या पैलूंचा दीन दुबळ्यांचे, गरीब वंचितांचे शोषण करण्यासाठी व भेदाभेद टिकवून ठेवण्यासाठी पद्धतशीरपणे वापर केला जात असतो.

सर्वसामान्य जनतेला शोषणाचे प्रकार कळत नाहीत.. किंवा ज्यांना ज्यांना कळाले आहेत त्यांनी व्यवस्थेविरुद्ध विद्रोह केला त्यांच्या आयुष्यात काटेपेरणी केली गेली. काहींना साम, दाम, दंड, भेद, नीती वापरून कसे संपवता येईल किंवा कसे झुलवत ठेवता येईल याबाबतही हा 'गनीम' सतर्क असतो. तो आपले अस्तित्व, आपले ठिकाण आणि आयुधं कोणती आहेत हे कळू देत नाही. म्हणूनच कवी आपल्या कवितेतून 'गनीमाची अगोचर अपरुपे आणि त्याच्या अस्तित्वाच्या खुणा सांगण्याचा प्रयत्न करतात...

**"आताही शत्रूंच्या छावण्यांची**
**पुराणी ठिकाणं तीच ती समजून**
**पाडून घेताहोत आपल्याच पायावर**
**दगड आपण फक्त भावनिक**
**शब्दहल्लकल्लोळात नि**
**शत्रू आपणास लोळवून जातो."**

कवी आपल्या शत्रूंच्या अनेकांगी मनसुब्यांना जाणतो. विचारवंतांना, प्रतिभावंतांना, संशोधकांना शत्रूच्या अदृश्य गनीमाचा शोध घेता येतो; मात्र सामान्य माणसाला या अनाकलनीय षडयंत्राच्या 'गनीमाचा कधीच सुगावा लागत नाही.

खरेतर कवी हा एक फिलॉसॉफर असतो. तो नेहमीच चिंतनाच्या मुळाशी जात असतो. त्यातही आंबेडकरवादी कवी हा व्यवस्थेच्या षडयंत्राचे वेळोवेळी विच्छेदन करत असतो; किंबहुना तो भविष्यकाळाचा भाष्यकार असतो; म्हणूनच हा षडयंत्रकारी 'गनीम' वेळोवेळी उध्वस्त करत असलेल्या पिढ्यांची व उद्याच्या पिढीच्या अंकुरांची कवीला चिंता वाटते..

**"आपण गर्क..भूतकालीन संघर्षाचे**
**अर्क काढून काढून चघळण्यात नि**
**शत्रू आपल्याच घोषणेसह...**
**आपल्या अंकुरांनाही उध्वस्त करीत**
**जातो पुढे पुढे..!"**

म्हणून कवी लिहितो....

**"आता थोडं सावध व्हायलाच हवं**
**पाठीशी उभं असणाऱ्यावर नि**
**पाठीवरून हात फिरवणाऱ्यावरही शंका घ्यायला**
**हवी."**

कवीच्या शंकेला कारणही तसंच आहे

**"शत्रू शुगरकोटेड असतो नि आपली फसगत होते."** कवी डॉ.उत्तम अंभोरे यांनी आपल्या कवितेतून नव्या पिढिला सामाजिकभान आणि जाण यावी यासाठी शत्रूच्या अनेक रुपाची ओळख करून देत सावध करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.. नव्हे त्यांच्याठायी समाजाप्रती असलेली तळमळ व अस्मिता त्यांना अस्वस्थ करते आणि कविता जन्म घेते...

ते आपल्या 'हवालदिल' या कवितेत लिहितात....

**"त्यांचे सारेच आंडू-पांडू, संत नि**
**संस्कृतीचे मोहक आलेख**

आपल्याला वरचेवर सरपटत ठेवतात". याच कवितेत कवीला हेही सांगावयाचे आहे की,

**"माफक बंडखोरांचे आता त्यांना**
**तसे काहीच नसते सोयरसुतक..!"**

षडयंत्रकारी व्यवस्थेच्या विरोधात बंड करणारे काही बंडखोर त्यांच्या गळाला लागणारेही असतात म्हणून कवी डॉ.उत्तम अंभोरे यांनी बंडखोरांबाबत माफक हा शब्द विचारपूर्वक वापरलेला आहे. शोषकांच्या डावपेचांची जाणीव आणि बंडखोर बांधवांच्या कमजोर नाड्यांची सतावणारी चिंता याच घुसमटीतून या कवितेचा जन्म झालेला आहे.

विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेच्या विकृतीकरणातून होत असलेल्या सामाजिक छळांचे आणि शोषणाचे अनेक संदर्भ उजागर करताना कवी आपल्या 'समरसता' या कवितेतून गनिमाच्या स्वरूपाचे दर्शन घडवतात....

**"त्यांचं समरसनं वाळवीच्या स्पर्शासारखं**
**पोखरत जाऊनही सतत मातीचे वंशज**
**भासविण्याचं मातीच्या मुलाम्याखाली**
**वावरण्याचं आता त्या एकिकरणातही**
**सतत पराभूततेचाच इतिहास, आपला नुस्ता ऱ्हास**
**ऱ्हास. 'समरसता' एक निमित्त बाकी तेच ते**
**पुराणसुक्त !"** हे संदर्भ उजागर करण्याचा कवीचा उद्देश हाच की, प्रस्थापितांनी आता पारंपारिक मिथकांद्वारे, दंतकथांद्वारे या भाबड्या जनतेला देवाधर्मात आणि कर्मकांडात अडकवू नयेच शिवाय भेदाभेदांच्या चौकटी उभ्या करू नयेत. डॉ.उत्तम अंभोरे यांची कविता समाजाला शहाणे करून सतर्क राहण्याचा सल्ला देते. ही कविता 'गनीमाचे नकळत स्वरुप सांगतांना गनिमाच्या गळाला लागलेल्या फितूर लोकांमुळे पुढच्या पिढीचे किती नुकसान झाले हेही सांगावयाचे टाळत नाही. समाजातील काही कार्यकर्त्यांनी व पुढाऱ्यांनी. फुले, शाहू, बाबासाहेबांच्या विचारांशी केलेली प्रतारणाही ही कविता आवर्जून नोंदवते. कवी डॉ.उत्तम अंभोरे आपल्या मनोगतात म्हणतात,"कविता हा अतिशय गांभिर्याने घेण्याचा विषय आहे" ते शतप्रतिशत खरेही आहे; कारण विद्रोही काव्याची निर्मितीच असत्याचा पर्दाफाश करण्यासाठी झालेली आहे. बाबासाहेबांनी व त्यांच्या समकालीन निष्ठावंतांनी समतेसाठी व्यवस्थेशी केलेला विद्रोह अलिकडचे कार्यकर्ते का विसरलेत.. ? की, त्यांची केलेली दिशाभूल त्यांच्या लक्षात येत नाही... म्हणून कवी लिहितात,..

**"विद्रोहाची माय रडते ढसाढसा नि**
**विद्रोहाशी नाळ जोडून**
**अस्मितेचे मळे फुलविणारे**
**तळ्याच्या फिरतात काठाकाठानं**
**त्यांचं विद्रोहाचं शस्त्र हरवलंय कुठं नि**
**पाण्याच्या बुडबुड्यासंगं त्यांचं प्रेम."**

कवी डॉ.उत्तम अंभोरे यांचे सामाजिक निरिक्षण अत्यंत सूक्ष्म आणि चिकित्सक आहे.

सामाजिक अस्मितेचा आव आणत तळ्याच्या काठाकाठाने फिरणाऱ्या कार्यकर्त्यांचे विद्रोहाचे शस्त्र तळ्याच्या बुडाशी हरवलंय आणि त्याच्या वर येणाऱ्या बुडबुड्यासंगं कार्यकर्त्यांचे प्रेम. अत्यंत चपखलपणे मारलेला टोमणा सामाजिक भान आणून देणारा आहे.

कारण एखाद्या कुत्र्याला जरी दगड फेकून मारला तर तो दगडाला चावत नाही, तर दगड ज्या दिशेने आला आहे त्या दिशेच्या माणसाचा शोध घेऊन त्यालाच चावतो; परंतु आमच्या बंडखोरांचा विद्रोह नेमका कशाप्रकारे आणि का ? डायव्हर्ट होतोय याची कारणंही ते आपल्या 'प्रगती' या कवितेतून उलगडून दाखवतात

**"सारा सुशिक्षितपणा..**
**आर्थिक सुरक्षिततेच्या कवचाखाली**
**प्रसिद्धीची दोन गोगलगायी शिंगं घेऊन**
**लाचारीत सरपटत जाणारा अन्**
**उगाच रस्ता उजाडत गेल्याचं समाधान मानून**
**धन्यता पावणारा ! बंडाचे झेंडे रोवण्याचं स्वप्नं**
**कधीतरी जोपासलं होतं...या सुशिक्षितपणाच्या**
**मातीत; पण सारेच सांड आंडं ठेचून घेण्यासाठी**
**उत्सुक असल्याची वास्तवता..."** उपरोक्त कविता विद्यमान पिढिला परखडपणे सुनावते की,"तुमच्या कुचकामी, लाचार सुशिक्षितपणाचे खापर तुम्ही अशिक्षित पिढीवर फोडणार असाल तर तुम्ही तुमच्याच लाचार मेंदूच्या शाईने लिहिताहेत तुमच्या मृत्यूचे जाहीरनामे."




डॉ.उत्तम अंभोरे यांची कविता समकालीन पिढीच्या अस्वाभिमानी, लाचार, बेईमानी, फितुर वृत्तीवर परखडपणे भाष्य करते; किंबहुना ती अत्यंत तळमळीने प्रबोधनाचे काम करत भविष्यकाळाचाही वेध घेते. कवीची समाजाप्रती असलेली अस्मिता, अस्मितेपोटी असलेली सामाजिक जाणीव, जाणिवेत असणारी संवेदनशीलता आणि त्याच संवेदनशीलतेतून निर्माण होणारी अस्वस्थता..ही कवीची अदृश्य वेदनाच आहे आणि ही वेदना कवीला स्वस्थ बसू देत नाही. ती नोंदवायला भाग पाडते..मग ती कविता असो की, विचार. साहित्याचे माध्यम कोणतेही असो, ग्रामीण असो, दलित असो, स्त्रीवादी असो, जनवादी असो, आदिवासी असो. सर्व स्तरावरून या शोषणाचा विरोध झाला पाहिजे; कारण एकाच समुहाचे शोषण होत नसून दलित, पीडित, वंचित, दुर्बल, कष्टकरी अशा अनेक घटकांची दिशाभूल करत शोषण केले जाते आणि ह्या सर्व घटकांचा शोषणकर्ता 'गनीम' मात्र एकच आहे; परंतु हा 'गनीम' सतर्क आणि संवेदनशील असणाऱ्या आंबेडकरवादी समुहावर प्रामुख्याने लक्ष ठेऊन असतो. या समुहाला जेव्हा ह्या गनीमाचा शोध लागत असतो तेव्हा त्या समुहाची दिशाभूल करण्याची रुपे बदलली जातात... अशी अपरुपे तो निर्माण करत असतो. अडीच हजार वर्षापूर्वीच्या इतिहासाची मोडतोड करून आपली संस्कृती बहुजनांच्या माथी मारण्यात आली ती केवळ आंबेडकरवादी समुहालाच माहित आहे...म्हणून गनिमाचे लक्ष आंबेडकरी चळवळीकडे असते. बुद्धकालातील गणव्यवस्थेचे रुपांतर वर्णव्यवस्थेत करणारी व त्याचेच रुपांतर जातीप्रथेत करणारी व्यवस्थाच शोषणाचा 'गनीम' ठरलेली आहे. ह्या धर्मवादी, कर्मकांडी, शोषणकर्त्या समुहासोबत चार्वाक, महावीर, बुद्ध, कबीर, फुले, आंबेडकर ह्या महामानवांनी जो विद्रोह केला होता, तो विद्रोह अजूनही करावा लागतो आहे. वास्तविक पहाता त्यांनी केलेला हा विद्रोह समता, बंधुता व मानवी हक्कांसाठीचा होता. तो मानवी मूल्यांची जोपासना करण्यासाठीचा होता, तो विद्रोह आजही आहे. मानवतावादासाठीचा हा विद्रोह इतका टोकदार होऊनही इथली शोषणव्यवस्था आपली पकड सैल न होऊ देता वेगवेगळ्या मनसुब्यांद्वारे घट्ट टिकवून ठेवते.

आजच्या पिढीचे अनेक कवी, लेखक, विचारवंत आपापल्या परिने मानवमुक्तीच्या विचारांचा प्रचार,प्रसार करत आहेत; मात्र विज्ञानयुगातही व्यवस्थेशी तडजोडीचे राजकारण करून परंपरांचा मूलतत्त्ववाद टिकवून ठेवण्यासाठी आमच्याच बांधवांकडून परिवर्तनावादाचा खून केला जातोय.! ही बाब आमच्या लक्षात येऊ नये म्हणून त्याचवेळी आमच्या ओठांवर विद्रोहाच्या गाण्याऐवजी असतात..

**"स्वातंत्र्याची गाणी हम होंगे कामयाब,**
**किंवा क्रिकेटचे स्कोअर, किंवा**
**चित्रपट नट्यांचे गोडवे.**
**काळ्या चित्रफितीतून होतात रुपांतरीत... ढंगदार**
**रंगसंगतीत नि पठारापल्याडचे डोंगर झरे आटून**
**चालल्याचीही नसते खबर; शहाणपणाची झूल**
**पांघरून दिसांधळ्यांच्या ते आडोसगावात.**
**विद्रोहाची माय रडते ढसाढसा नि बाप जसाच्या**
**तसा उभा..**
**डोळे पांघरून आकाश कवेत घेण्यास सज्ज."**

या देशात लोकशाहीची घटनामूल्ये मुद्दामच न रुजू देण्यात व छळ करण्यात मूलगामी शोषण व्यवस्थेचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे.. तो अगदी गावापासून ते राजधानीपर्यंत..

**" हे माझ्या प्रिय गावा**
**तू तर सतत नाडतच नेलं**
**तोंड दाबून दिला बुक्यांचा मार**
**मनातही नाही जिंकायचं येऊ दिलं"**
**" हे माझ्या प्रिय गावा**
**तू माझ्या आया-बहिणींनांही**
**माणूस म्हणून कधी पाहिलेच नाही.**
**त्यांना म्हणाला..**
**आई-माई-बाई नावापुरता,**
**गायीला म्हणाला माय, पण..**
**यांच्या गळ्याचं दावं सोडलं नाही.**

" नाही रे" वर्गाला कमालीची वाईट वागणूक देण्याचे कारस्थान केले गेले.. आज त्याचे स्वरुप फक्त रुपांतरीत झाले आहे. वागणूक तीच आहे, विषमता तीच आहे. ती टिकवून ठेवणारे ठेकेदार आता अधिकच सतर्क राहून आपल्या कुटनीतीचा रंग बदलत असतात..."नाही रे" वर्गाचे बंड आणि बंडखोरीही अशीच उध्वस्त केली जाते. "नाही रे' वर्गाची बंडखोरी मुद्देसूद भाषणांचे बॉम्बगोळे सारं काही शांतपणे ऐकून डूख धरून बसलेल्या जनावरासारखे 'आहे रे' वर्गाने एकदाच आक्रमण केले मार्क्स, हेगेल, फुले, आंबेडकर, लाल, काळे, निळे निशान...

**लोकशाही वगैरे सारेच जमीनदोस्त झाले"**

कवी डॉ.उत्तम अंभोरे यांची कविता "नाही रे" वर्गाच्या बंडाचे मनसुबे कसे हाणून पाडले जातात ते विद्रोही बंडखोरांच्या लक्षात आणून देण्याचे काम ही कविता करते.. इतकेच नव्हे,तर ती आंबेडकरी अनुयायींच्या काही चुकांनाही उजागर करताना दिसते.

**"काल आपल्या घरी निळा सूर्य**
**उगवल्याच्या गाथा ओठाओठांवर,**
**गाथांना कथनाचं एक रूप कथांच्या दंतकथाच**
**आपण करीत जातो आपलीही करतो तोंडपूजा**
**अन् जमल्यास पुतळ्याच्या सावलीत विसावून**
**जातो."** कवी डॉ.उत्तम अंभोरे यांनी आंबेडकरी अनुयायींच्या बऱ्याच गोष्टी कळत नकळत लक्षात आणून दिलेल्या आहेत. कारण कवी स्वतः आंबेडकरवादी विचारधारेशी एकनिष्ठ आहेत.. नव्हे; तो त्यांचा सत्यशोधकी, प्रामाणिक व स्वाभिमानी पिंड आहे. म्हणून समाजास्मितेपोटी त्यांना ह्या कवितेतून जे काही सांगावयाचे आहे ते निर्भयपणे व अधिकारवाणीने नोंदवलेलं आहे. दलित ही संकल्पना समस्त वंचित, पीडित,दुर्बल घटकांसाठी व परंपरेने बहिष्कृत केलेल्या समुहासाठी आलेली आहे. त्यांच्या व्यथा वेदनांना उजागर करणारं साहित्य हे दलित या संकल्पनेभोवती फिरत असले तरी ते मानवीमूल्यांच्या हक्कासाठी लिहिलेलं साहित्य होय. म्हणून दलित साहित्य या संकल्पनेकडे मानवतावादासाठीचा विचार मांडणारे साहित्य या अर्थाने पाहणेच योग्य होईल.

आंबेडकरवादी साहित्य हे कुठल्याही एका समुहाची पाठराखण करत नाही, तर ते मानवमुक्तीच्या संवैधानिक मूल्यांचे हक्क सांगणारे साहित्य आहे.. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या पानापानांवर मानवीमूल्यांचा आणि मानवमुक्तीचा जाहीरनामाच लिहून ठेवलेला आहे. संविधानच इथल्या समग्र वंचित, पीडितांच्या, दुर्बलांच्या व्यथा वेदनांना वाचा फोडू शकते.ती ताकद फक्त डॉ.आंबेडकरांनी लिहून ठेवलेल्या संवैधानिक विचारात आहे म्हणूनच आंबेडकरवादी विचारधारा किंवा आंबेडकरवादी साहित्य हे मानवी हक्कासाठीचा अधिकार मागणारे साहित्य असते..म्हणून ते साहित्य मानवतावादीच साहित्य ठरते.

डॉ.उत्तम अंभोरे यांची 'गनीम' मधील कविता पारंपारिक विषमतावादी मूल्यांना नाकारते म्हणूनच ती प्रस्थापितांच्या शोषणाच्या पैलूंचा पर्दाफाश करते.. अर्थात या कवितेला सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक समतावाद हवा आहे.. जो बुद्ध,कबीर,फुले,मार्क्स, आंबेडकर या महामानवांना अपेक्षित होता..शोषितांच्या शोषणाच्या व छळांच्या अनेक क्लृप्त्या ऐकून घेण्याचा व सांगण्याचा अट्टाहास बंद केला पाहिजे म्हणून कवी त्वेषाने म्हणतात,...

**"नेहमी नेहमी**
**त्याच त्याच गोष्टी**
**सांगण्याची नि ऐकण्याची**
**सवयच झालीये आपल्याला...**
**आता आपले कान कापले पाहिजेत नि**
**सांगणाराचे तोंड फोडले पाहिजे."**

डॉ.उत्तम अंभोरे यांच्या कवितेने मराठी कवितेचे वैचारिकविश्व अधिकच व्यापक करून मराठी कवितेला नवा आयाम दिला आहे.

कारण डॉ.अंभोरे यांची कविता आक्रस्ताळेपणा करत नाही तर ती आता अनुभूतीच्या पातळीवर चिकित्सक आणि चिंतनशील होत जाऊन ती आत्मशोध घेते. आत्मचिंतनातून आलेल्या या कवितेला वर्तमानातल्या भासमान जगाची ओळख झाल्यामुळे ती शोषणाच्या मूळगाभ्याचा शोध घेते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तात्विक विचारात सत्याचा शोध होता.सत्यासाठी लढण्याची धमक होती. बाबासाहेबांच्या विचारांचे सत्व आणि तत्व या कवितेने स्वीकारले आहे म्हणून ती इथल्या विषमतावादी मूल्यांना थेट नाकारते व भेदाधिष्ठित शोषणाचे षडयंत्र उजागर करत विकृत मनसुबे हाणून पाडण्याचे धाडस करते. म्हणूनच दलित कवितेने, साहित्याने मराठी कवितेत,साहित्यात मोलाची भर घालून एक नवा आयाम, नवा प्रवाह दिल्यामुळे मराठी साहित्यविश्वाच्या समीक्षेला खरेतर हे आव्हानच ठरले आहे. डॉ.उत्तम अंभोरे यांच्या गनीम' या संग्रहातील काही कविता सहज अर्थाला जन्म देणाऱ्या आहेत. कवितेतील उपमान आणि उपमेये ही उपहासगर्भ असले तरी ती आशयछटांच्या कल्लोळात अडकत नाहीत किंवा दुर्बोध होतांना दिसत नाहीत. 'गनीम'मधील काव्यात येणाऱ्या 'प्रतिमा, प्रतिके वाचकांच्या चिंतनाची व्याप्ती वृद्धिंगत करणारी आहेत. मुक्तछंदात लिहिलेल्या दलितकाव्यात आपली स्वतंत्र धाटणीची सौंदर्यस्थळे आहेत; परंतु या धाटणीच्या सौंदर्यस्थळामागे कमालीची वेदना प्रश्नांकित झालेली दिसून येते...डॉ.उत्तम अंभोरे यांच्या कवितेने समाजातील गाफील समूहाला सावध करण्याचा वसा घेतला आहे. तिने विषम व्यवस्थेच्या कुठल्याही घटकावर बॉम्ब फेकण्यापेक्षा चिंतनाच्या मुळाशी जाऊन गनीमाची चिकित्सा केली आहे; म्हणून ती आपले वेगळेपण सिद्ध करते. ती कबीर, फुले,मार्क्स, बाबासाहेब यांच्या विचारांची वारसदार असून चिंतन आणि चिकित्सा हा तिचा स्थायीभाव आहे. विद्रोही कवी अर्जुन डांगळे यांच्या प्रस्तावनेने संग्रहाला उंची लाभली आहे. सौरव प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या दर्जेदार संग्रहाचे सूचक,वेधक मुखपृष्ठ चित्रकार दासू भगत यांचे असून डॉ.उत्तम अंभोरे यांच्या चिंतनशील काव्याचा आकृतीबंध मराठी दलितकाव्यसृष्टीला नवा आयाम देणारा आहे.

**गनीम - काव्यसंग्रह, कवी-उत्तम अंभोरे**
**प्रकाशक - सौरव प्रकाशन, छ.संभाजीनगर.**
**या सदराचे लेखक- सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक, समीक्षक आहेत.**

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण होणारी आव्हाने



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) बद्दलची चर्चा तीव्र झाली आहे. मानवी जीवनातील गुंतागुंत जसजशी वाढत चालली आहे, तसतशी माणूस पर्यायी पद्धतींद्वारे त्या सोडवण्याचा प्रयत्न करत आहे. एकीकडे देशाची आणि जगाची वाढती लोकसंख्या मोठी समस्या बनत चालली आहे, त्यासाठी संसाधनांची काळजी करावी लागत आहे, तर दुसरीकडे मानवाकडून केली जात असलेली अनेक कामे आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने केली जात आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता असलेले यंत्र मानवाप्रमाणेच काम करत आहे.**

सतत संशोधनाचा परिणाम असा झाला आहे की या मशीनमधील त्रुटी कमी होत आहेत आणि काम वेगवान होत आहे. विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पद्धतीनुसार त्याला मदत करणे, भाषा प्रक्रिया, ऑनलाइन गेम खेळणे, रोगांवर उपचार करणे इतकेच नव्हे तर शस्त्रक्रिया करण्यापर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेची गरज पडू लागली आहे.

तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांना सूचना आणि व्याख्याने देता येऊ शकतात. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून उत्तर कळीच्या मदतीने परीक्षेचे मूल्यमापन आणि आकडेवारीद्वारे विद्यार्थ्यांच्या निकालांचे तपशीलवार विश्लेषण करता येऊ शकते. एवढेच नाही तर उत्तरपत्रिकेत विद्यार्थ्यांकडून झालेली चूकही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने सहज अधोरेखित करता येते. आर्टिफिशियल इंटेलिजन्सची सुरुवात 1956 मध्ये जॉन मॅककार्थी यांनी केली होती. त्यासाठी संगणकाद्वारे तयार होणारी रोबोटिक प्रणाली तयार केली जाते, त्यानंतर मानवी मेंदूवर आधारित सॉफ्टवेअरच्या सहाय्याने प्रोग्रामिंग करून त्यावर विचार करण्याचा, समजून घेण्याचा आणि ऑपरेट करण्याचा प्रयत्न केला जातो. कृत्रिम बुद्धिमत्ता विश्लेषण करते की मानवी मेंदू कसा विचार करतो, समजतो आणि शिकतो, त्यानंतर त्या विश्लेषणाच्या आधारे स्वतःचे 'अल्गोरिदम' तयार करतो आणि कार्य करतो. त्याचप्रमाणे, ते विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचे आणि क्षमतांचे मूल्यमापन करू शकते आणि त्यांना उच्च क्षमतांसाठी मार्गदर्शन करू शकते. काही कंपन्या आर्टिफिशियल इंटेलिजेंसचा वापर करून वेगवेगळ्या वयोगटातील मुलांसाठी गणित-भाषा रुचीपूर्ण बनवण्यासाठी ऑनलाइन आणि व्हिडिओ गेम्स तयार करत आहेत. भाषेचे व्याकरण, शब्द आणि वाक्यरचना यांतील अशुद्धता शोधून त्या चुका सुधारल्या जात आहेत. अशा प्रकारच्या ॲप्सच्या आगमनामुळे भाषा-संपादनासाठी असणारे इतरांवरील अवलंबित्व कमी होत आहे. 1980 पासून, पाचव्या पिढीचा संगणक बनवण्याचा प्रकल्प सुरू झाला आणि त्यानंतर सुपर कॉम्प्युटर तयार होऊ लागले. 1997 पर्यंत असे सुपर कॉम्प्युटर बनवले गेले, ज्यांचा मेंदू सामान्य माणसापेक्षा वेगाने धावू लागला. IBM च्या 'डीप ब्लू' नावाच्या कॉम्प्युटरचा मेंदू इतका वेगवान बनला की त्याने एका प्रसिद्ध बुद्धिबळपटूचा पराभव केला. त्याच्या यशामुळे कॉम्प्युटरला जटिल गणिती आकडेमोड, आर्थिक मॉडेलिंग, बाजारातील ट्रेंड, गंभीर धोक्याचे विश्लेषण इत्यादी करण्यासाठी मार्ग मोकळा झाला. फेब्रुवारी 2011 मध्ये 'वॉटसन' नावाच्या पोस्ट-डीप ब्लू कॉम्प्युटरने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने लाखो लोकांसमोर दोन प्रसिद्ध बुद्धिबळपटूंचा पराभव केला. आज, प्रत्येक गरजेनुसार, विविध प्रकारचे कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल तयार आहेत - काही पूर्णपणे प्रतिक्रियाशील आहेत, तर काहींची स्मरणशक्ती मर्यादित आहे. परंतु विकसित आणि विकसनशील देशांमध्ये ज्या पद्धतीने संशोधन सुरू आहे, त्यामुळे येणाऱ्या काळात मानवी मेंदूसमोरील सर्वात मोठे आव्हान कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मॉडेलचे असणार आहे. नवीन युगातील मॉडेल ब्रेन थिअरी आणि आत्म-जागरूकतेच्या आधारे कार्य करतील.त्याची झलक 'चॅट बॉट'च्या अनेक पर्यायांमध्ये पाहायला मिळते. याची काही प्रमुख उदाहरणे म्हणजे अलेक्सा, गुगलचे असिस्टंट होम, ॲपलचे सिरी इ. ते सर्व 'चॅट बॉट्स', मशीन लर्निंग आणि तुमच्या दिशानिर्देशांवर काम करतात. चॅट बॉट्सचे दोन प्रकार आहेत. एक, जे तोंडी सूचनांवर काम करतात आणि दुसरे, लेखी सूचनांवर. आजकाल 'चॅट जीपीटी'ची खूप चर्चा आहे. एक प्रकारचा 'संगणक सॉफ्टवेअर लँग्वेज मॉडेल' आहे, जो 'की-इनपुट कमांड'च्या आधारे माहिती देतो. तो काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला आणि काही वेळातच त्याची लोकप्रियता जगभरात पसरली. तुम्हाला एखादे पत्र लिहायचे आहे, छोटासा लेख लिहायचा असेल, अथवा एखादा प्रस्ताव द्यायचा असेल तर, 'चॅट जीपीटी' हे सर्व काम फक्त दहा मिनिटांत करेल! त्याच्या आगमनामुळे लाखो लोकांचा रोजगार जाण्याची शक्यता आहे. संशोधन कार्य आणि 'कॉपीराइट'वरही याचा परिणाम होणार आहे. समजा एखाद्या विद्यार्थ्याला पर्यावरणावर लेख लिहायचा आहे आणि त्याने तो लेख 'चॅट जीपीटी'च्या मदतीने लिहिला, तर त्या लेखाचा खरा लेखक कोण ?, 'चॅट जीपीटी', विद्यार्थी की 'चॅट जीपीटी' ने जिथून मजकूर घेतला आहे तो ? पण सध्या तरी 'चॅट जीपीटी' तो कंटेंट कुठून मिळवतोय आणि ती मिळालेली माहिती कितपत तथ्यपूर्ण आहे हे जाणून घेण्यात अडचण आहे. पण यामुळे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने चोवीस तास काम करणारी मशीन मिळणार आहे. ते आपोआप कार्य करत राहील आणि चुका देखील कमी करेल. पण प्रश्न असा आहे की हे यंत्र मानवी सर्जनशीलतेशी स्पर्धा करू शकेल का ? शाळा-महाविद्यालये-विद्यापीठांची अनेक प्रशासकीय कामे, वर्गात हजेरी घेणे आदी कामे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या सहाय्याने केली जातील, पण शिकवण्यासाठी 'हायब्रीड मॉडेल' तयार होण्याची शक्यता आहे. मॅथ्यू लिंचला शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेची मोठी क्षमता दिसते. शिक्षकांच्या धड्याच्या (पाठाच्या) नियोजनापासून ते भाषा शिकणे, परीक्षेची तयारी आणि विद्यार्थी-पालकांशी संवाद, व्यावसायिक प्रशिक्षण आणि मानव संसाधन व्यवस्थापन इत्यादींपर्यंत त्यांची उपयुक्तता दिसते. उच्च शिक्षणात, आजकाल कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर संशोधन कार्यात शैक्षणिक साहित्यिक चोरी रोखण्यासाठी केला जातो. संशोधन विद्यार्थ्याने प्रबंधाच्या मौलिकतेचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, तरच तो विद्यापीठात आपले संशोधन कार्य सादर करू शकतो. काही सॉफ्टवेअर्स दुसरीकडून घेतलेल्या संशोधन कार्याच्या मजकुरातील ओळ न ओळ पकडतात. पण आता 'चॅट जीपीटी' हे संशोधनातील शैक्षणिक लेखनासाठीही उपयुक्त मानले जात आहे, कारण ते सामग्रीचे भाषांतर करणे किंवा लेखाचे संक्षिप्तिकरण करणे इत्यादीसाठी मदत करते.



पण त्याची मर्यादा ही आहे की ती मौलिक विचार मांडू शकत नाही. हे फक्त उपलब्ध साहित्य सादर करू शकते आणि तेही संदर्भाशिवाय. अशा प्रकारे, इतर कोणाचे साहित्य वापरण्याचा आणि कधीकधी पक्षपाती होण्याचा धोका देखील असतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व ओळखून भारत सरकारने शैक्षणिक संस्थांमध्ये उत्कृष्टतेची केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हैदराबाद आणि काही इतर संस्था आता आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये पदवीधर कार्यक्रम देतात. येत्या काळात 'चॅटबॉट', 'रोबोटिक्स', 'मशीन लर्निंग' हे केवळ शिक्षण आणि शिक्षकांच्या प्रशिक्षणातच अडकणार नाहीत, तर यांच्या स्वतःच्या कामाचे मूल्यमापन करण्याची पद्धतही यातून विकसित होण्याची शक्यता आहे. त्याच्या वाढत्या प्रभावामुळे शैक्षणिक कामाचा दर्जा कसा असेल, हे येत्या काळात आपल्याला कळेल.याच्या वाढत्या प्रभावामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, 'रोबोटिक्स', 'डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग', 'बिग डेटा इंटेलिजन्स', 'रिअल टाइम डेटा' आणि 'क्वांटम कम्युनिकेशन' या क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण, मानव संसाधन आणि कौशल्य विकासाचे कार्य जगभरात वाढत आहे. अनेक कंपन्या त्यांचा व्यावसायिक कारणांसाठी वापर करत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा आता अब्जावधी डॉलरचा उद्योग बनला आहे. परंतु व्यक्तीपासून राष्ट्रापर्यंत गोपनीयतेचा भंग होण्याचा धोका देखील आहे, ज्यामध्ये सुरक्षित डेटा ठेवणे ही चिंतेची बाब आहे. काहींचा असा विश्वास आहे की कृत्रिम बुद्धिमत्तेवर जास्त विसंबून राहणे हे मानवाच्या गोपनीयता आणि प्रतिष्ठेला धोका पोहचवू शकते. पण हे निश्चित आहे की आर्टिफिशियल इंटेलिजन्स आपल्या जगण्यात, कामात, अभ्यासात आणि संशोधनात खूप मोठा बदल घडवून आणणार आहे.

# एक आठवण कवी, डॉ. ना.गो.नांदापूरकर -आणि माझी मराठी या कवितेची आठवण



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342


आधुनिक केसरी

**रसिक हो नमस्कार - आपल्या मनात खूप जुन्या आठवणी असतात.कधी कधी या आठवणींची पुन्हा नव्याने जुळवणी करणे म्हणजे मोठी कसरत करावी लागते. हा लेख लिहितांना माझ्या मनाची स्थिती काहीशी अशीच झाली आहे. या लेखाच्या निमित्ताने नव्या पिढीला , माझ्या वाचक -मित्रांना , एका थोर व्यक्तिमत्वाचा परिचय करून देतो आहे. मित्र हो- डॉ.ना.गो. तथा प्रा.नारायण गोविंद नांदापूरकर यांचा जन्म -मराठवाड्यातील कळमनुरी येथे १४ सप्टेंबर -१९०१ साली आणि मृत्यू -९ जून १९५९ साली - हैद्राबादला झाला.**

डॉ.ना.गो. नांदापुरकरांनी उस्मानिया विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून काम केले , मराठी विभागाचे प्रमुख म्हणून ते निवृत्त झाले.
त्याकाळी हैद्राबाद संस्थानात सर्व व्यवहार हे उर्दू भाषेत होत असत .मराठवाड्यात आणि निजाम स्टेटमध्ये "मराठी भाषेसाठी "तसा हा प्रतिकूल काळ होता. अशा काळात "मराठी भाषेत साहित्य लेखन करणार्यांनी माय-मराठीची जपणूककेली असेच म्हणावे लागेल. डॉ.ना.गो. नांदापूरकर यातील एक महत्वाचे व्यक्तिमत्व होय. कवी असलेले डॉ.नांदापूरकर हे या पिढीतले "मराठी साहित्यिक आणि अभ्यासक होत. पंत कवींच्या काव्याचे ,आणि लोक-साहित्यचे चिकित्सक अभ्यासक म्हणून त्यांचे कार्य प्रसिध्द झाले. "मुक्त-मयुरांची भारते " हा त्यांचा अभ्यासपूर्ण ग्रंथ सर्वपरिचित आहे. मराठवाड्यातील ग्रामीण आणि लोक-जीवनाच्या अभ्यसाच्या निमित्ताने त्यांनी परिश्रमपूर्वक लोक-साहित्य गोळा केले आणि ग्रंथरूपाने हे मौलिक साहित्य सिध्द केले. डॉ.ना. गो.नांदापुरकार यांच्या ग्रंथ-संपदेतील काही ठळक नावे - " मऱ्हाटी स्त्री रचित राम कथा , " मायबोलीची कहाणी ( मराठी बोली भाषांचा इतिहास ), " स्त्री -गीत संग्रह - भाग - १ ते ३ ( संपादित ). रसिक हो- डॉ.ना. गो.नांदापुरकरसरांच्या या साहित्यिक माहितीपुरता हा लेख सीमित नाहीये कारण या नांदापूरकर परिवाराशी माझे आजोळचे ऋणानुबंध आहेत ..
डॉ.नारायणराव नांदापूरकर यांच्या पत्नी - भागीरथीबाई नांदापूरकर ,या माझ्या आईच्या -( द्वारकाबाईची ) सख्खी आत्याबाई होत्या.
माझे मोठे मामाजिंतूरचे -पांडुरंगराव वसेकर



वकिलीचे शिक्षण घेण्याच्या निमित्ताने हैद्राबादला नांदापूरकर -आत्याच्या घरी होते. शिष्यवर्गासाठीचे सर असलेले नांदापुरकर " पारिवारिक मंडळीसाठी " आमचे अण्णा होते ". १९६५ साली हैद्राबाद बँकेत असलेल्या माझ्या वडिलांची बदली हैदराबादच्या आबिद- रोडवर असलेल्या " हेड ऑफिस- गन -फौंड्री शाखेत झाली. हेल्थ -लीग जवळ असलेल्या अरविंद गाजरे यांच्या बंगल्यात आम्ही किरायेदार म्हणून राहिलो . बडी-चावडी नावाने हा परिसर ओळखला जातो. तिथून जवळच ..३-३-८३६ /३ .हा पत्ता मराठी माणसाना पाठ असे. डॉ.ना.गो. नांदापूरकर यांचे हे निवासस्थान होते. आता हे जुने भव्य प्रासादिक घर इतिहास -जमा झाले आहे. १९६५ ते १९६७ या काळातील आमच्या हैदराबादच्या वास्तव्यातल्या नांदापूरकर परिवारात- ती. भागीरथी -आजी, दिनुमामा , आणि रजनीमामी, संध्या, संजय, स्मिता, सतीश हे मेम्बेर्स होते. मी काचीगुडा हायस्कूलमध्ये एच एस सी चा विद्यार्थी होतो. हेल्थ -लीग पासून खाली जाणार्या रस्त्याने कुतबीगुड्यात जाणे खूप सोयीचे होते. डॉ.ना .गो.नांदापूरकरांची कन्या " दयाबाई -ज्यांना आम्ही बाई -मावशी "म्हणायचो . बाई-मावशी आणि वामनराव वरगंटीवारकाका - "हे जोडपे एकदम दिलखुलास होते. त्यांची मुलं - "राणी ( विद्या ), अनिता ,सुनीता , आणि सुनील ही आमची मावस-भावंडे.मी शाळेतून घरी जाताना दिनुमामाकडे गेलो की आधी माडीवर जायचो , जिना चढून वर गेले की , समोर भला मोठा सन्दुक असायचा, त्यात भली जाड जुड पुस्तके असायची "उत्सुकतेने मी अनेकवेळा ती पुस्तके पाहिली , वाचली ,पण डोक्यात त्यावेळी तरी काहीच शिरले नाही ", या पेटीत जे आहे " ते खूप काही वेगळे आहे ,असामान्य आहे " असे वाटायचे .
पुढे - १९८० -१९९० च्या दशकात परभणीच्या वास्तव्यात आणि साहित्य -क्षेत्रात वावरतांना मला डॉ.ना..गो. नांदापूरकर हे व्यक्तिमत्व एक थोर कवी-साहित्यिक -अभ्यासक आहेत "हे समजत गेले, उमजत गेले. अजून ही मला , माझ्या शाळेचे ते हैद्राबादी- दिवस आठवतात ,आणि लगेच " पुस्तकांचा खजिना असलेला " "तो सन्दुक आठवतो " आणि वाटते की, "मी न पाहिलेल्या नांदापूरकर आजोबांच्या " ,वास्तुतल्या माझ्या त्या वास्तव्यात , त्यांच्या पुस्तकांच्या स्पर्शाने , माझ्यात थोडेसे का होईना "लेखन -गुण " आलेले आहेत. माझ्या आजोळच्या वास्तूचे हे अमोल देणे माझ्यासाठी "अक्षर- लेणे "आहे अशी माझी भावना आहे..
हैद्राबाद सोडल्यावरही पुढे अनेक वर्षे दिनुमामा आणि रजनीमामींच्या भेटीसाठी आम्ही हक्काने -प्रेमाने सुट्टी घालवायला जायचो . जुने घर -त्यातलीआपली माणसे मनात कायम घर करून राहिली आहेत.
आजही नांदापुरकर - दिनुमामाच्या नव्या पिढीने -संजय -दीपा , सतीश -अर्चना , या जोड्यांनी स्नेह-संबंध जपून ठेवले आहेत. संध्या आणि स्मिता या दोघी फेसबुकवर भेटतात. बाई-मावशीच्या दोन कन्या - अनिता प्रकाश ,आणि सुनीता कुलकर्णी ..पुण्यातच असल्यामुळे समक्ष भेटी होतात . हैदरबादला असणाऱ्या सुनील आणि राणी ( विद्या ) यांच्या भेटी होऊन खूप दिवस झालेत. असो. 2018 ला मी हैद्राबादला गेलो, कुतबीगुडयातील रोडवर असलेल्या त्या घरावर तीच " घर -नंबर प्लेट अजूनही तशीच आहे, आत गेल्यावर भला मोठा बोळ चालून गेल्यावर समोर दिसयच ते " जुने घर, जाळीचा व्हरांडा, झाडांनी भरलेलं अंगण, काही नव्हतं, त्या जागी अनेक मजली अपार्टमेंट उभे राहिलेले पाहून, तो जुना काळ तरळून गेला, मन गलबलून आले.
रसिक हो- डॉ.ना.गो. नांदापूरकर रचित "माझी मराठी "ही कविता -सुलेखनस्वरूपात -औरंगाबादच्या इफमा संस्थेचे प्राचार्य आणि माझे धाकटे बंधू -अनंत वि.देशपांडे यांनी सादर केली आहे.
आदरणीय डॉ.ना.गो.नांदापूरकर " -ती. अण्णा -यांचे "स्मरण आपणा सर्वांना आवडेल असा विश्वास वाटतो.


माझी मराठी
- डॉ.ना.गो. नांदापुरकर रचित

मराठी असे आमुची मायभाषा,
हिच्या कीर्तीचे तेज लोकी चढे ।
गोडी न राहे सुधेमाजी आता,
वळाली सुधा स्वर्गलोकाकडे ॥
आजन्म युध्दे जरी संगरीही,
कधी भागली नाही एक क्षण ।
द्या आश्रया वाल ह्या या सतीला,
असे लाभले एक सद्रक्षण ॥
ही कामरूप प्रसंगानुरूप,
स्वरूपास्वये पालटे भामिनी ।
घेती पुनर्जन्म सारी पुराणे,
त्यजूनी स्वनिर्वाण काया जुनी ॥
जाईजुईची कळी कोवळी ही,
परी साद देईल हेमाद्रीला ।
छेडुनीया श्रौती निर्मळ माझी,
मराठीच शुन्यातूनी क्रांतीला ॥
आम्ही मराठे हीचे पुत्र लोकी,
कधी भ्यावयाचे मुळी ना कुणा ॥
आकंठ प्यालो हिचे दुग्ध आम्ही,
पहा रोमारोमातुनी या खुणा ॥
तोडा, शिरा, दुग्धधाराच येती,
न हे रक्त वाहे शरीरातुनी ॥
माझी मराठी मराठाच मीही,
असे हे शब्द येतील हा त्यांतुनी ॥

- सुलेखन: अनंत वि.देशपांडे, ईफमा, औरंगाबाद.

# दिंडोरी तालुक्यातील धरणे पन्नास टक्क्यांच्या आत

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्याला धरणांचे माहेर घर म्हणून संपूर्ण जिल्ह्यात नावलौकिक आहे. परंतु सध्या आवर्तन सुरू असल्यामुळे आता सर्वच धरणे पन्नास टक्क्यांच्या आता पाण्याची पातळी आल्याने पाणी नियोजनांची मागणी होत आहे. करजंवण धरण हे तालुक्यातील सर्वात मोठे धरण मानले जाते. या धरणांतून दिंडोरी तालुक्यासह निफाड, मनमाड, येवला इ.ठिकाणी पिण्याच्या पाण्यासह शेतीला रब्बी हंगामासाठी पाणी आरक्षित असल्यामुळे आवर्तने सोडली जातात. मात्र पुढील एप्रिल व मे महिन्याच्या कडक उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता करजंवण धरणातील पाण्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी तालुक्यात जोर धरू लागली आहे.





करजंवण धरणांतून सध्या काही दिवसांपासून रब्बीसाठी ६०० क्युसेस तर गेल्या तीन दिवसापासून हा पाणी प्रवाह ९०० क्युसेस करण्यात आला. त्यामुळे करजंवण धरणांतील पाणीसाठा जवळजवळ ४७% एवढा शिल्लक राहिला आहे.गेल्या २३ दिवसांपासून हे पाणी पालखेड धरणांत सोडण्यात आले आहे. पालखेड धरणाच्या डाव्या कालव्यातून २५मार्चपासून ८००क्युसेसने निफाड व येवला तालुक्यातील शेतीच्या रब्बी हंगाम व पिण्यासाठी सोडण्यात येणार आहे. निफाड, येवला, मनमाड तालुक्यांसाठी करजंवण धरणांतील पाणी कायमच आरक्षित केलेले असते. त्यामुळे हे पाणी त्यांच्या हक्काचे असते. मात्र हे पाणी एकदाच मोठ्या प्रमाणांत दिल्या गेल्यामुळे येथील तालुक्यात ही कडक उन्हाळ्यात पाणी टंचाई निर्माण होत असते. यासाठी पाटबंधारे विभागाने या पाण्याचे योग्य नियोजन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. एकदाच महिनांभर आवर्तन सोडले जाते. नंतर पुन्हा दीड महिन्यानंतर आवर्तन सोडले जाते. कादवा नदीपात्रा शेजारी असणाऱ्या पाणी योजना ही मुळे कोरड्या पडतात. तालुक्यात धरणे असुन वर्षानुवर्ष कडक उन्हाळ्यात पाणी टंचाई निर्माण होत आली आहे. सर्व धरण व नदी पात्रातून शेतीसाठी बारामाई पाणी वाटप संस्थाची स्थापना करण्यासाठी महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाने परवानगी दिल्यास तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सोडविला जाईल. मात्र नदी पात्रात अजून ही बारमाई पाणी वापर संस्थाची स्थापना करण्याची परवानगी शासनाने दिली नाही. त्यामुळे करजंवण धरणातून गेल्या २३ दिवसांपासून पाणी बंद करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**धरणांतील पाणी साठा**

| | |
|---|---|
| करजंवण | :-४७% |
| पालखेड | :-४६% |
| पुणेगाव | :-५८% |
| ओझरखेड | :-६९% |
| वाघाड | :-२९% |
| तीसगाव | :-४९% |

स्थानिक जनतेची पाण्याची मागणी लक्षात घेता तालुक्यातील धरणांमधील पाणी साठ्याचे योग्य नियोजन करून धरणक्षेत्र व नदीपात्राशेजारील जनतेला योग्य न्याय दिला पाहिजे . त्याप्रमाणे करजंवण धरणांतील पाणी महिन्यांच्या आंतराने सोडल्यास कादवा नदीपात्रा शेजारील गावांना पाणी टंचाई निर्माण होणार नाही .भविष्यात येणाऱ्या पाणी टंचाईचे संकट लक्षात घेता करजंवण धरणांतील पाणी बंद करण्यात यावे .
**सचिन बर्डे, ( शेतकरी म्हेळुसके, ता .दिंडोरी)**

# मनदेव जंगलात आग



आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** अर्जुना बिटमध्ये असलेल्या मनदेव जंगलात आग लागली. ही घटना मंगळवारी रात्री घडली. या भीषण आगीत वनसंपदेची मोठ्या प्रमाणात हानी झाली. हेंल्पिग हॅण्ड चमुच्या मदतीने आग आटोक्यात आणली. यवतमाळ नजीकच असलेल्या मनदेव जंगलात भीषण आग लागली. या बाबतची माहिती वनविभागाचे मणपुर राऊंड चे वनपाल सुनील लोहकरे आणि मनपुर गावातील नागरिकांना मिळताच गावचे पर्यावरण रक्षक, MH29 हेल्पिंग् हॅण्ड टीम घटनास्थळी पोहचून पोहचले. दोन फायर ब्लोवर मशीनच्या साह्यायाने जवळपास दोन तासाच्या अथक प्रयत्नांनी आगीवर नियत्रंण मिळवले. यावेळी हेलपींग हॅण्ड टीमचे पर्यावरण प्रेमी जीवन तडसे, सूरज खडके, धीरज उम्रे, मुरली खडके, गावचे गणेश मुरमुरे, दीपक कसदर यांनी आग विजवण्यासाठी सहकार्य केले. जंगलास लागलेल्या आगीत अनेक प्रकारच्या वनौषधी, कीटक, पक्षी त्यांची अंडी, तृणभक्षी प्राणी यांचा अधिवास नष्ट होतो. ग्रामस्थ जंगलात जातेवेळी बिडी, सिगारेट ओढून त्याचे थुटके जंगलात फेकतात. यामुळे जंगलास आग लागते. यावेळी सदस्यांनी जंगलास आग न लागण्यासाठी जंगलालगतच्या शेताचे धुरे, काडीकचरा खबरदारी घेऊन जाळावा. जंगलास आग लावणे हा दंडनीय अपराध असून, विविध कलमान्वये दोषी व्यक्तीवर कारवाई होते. जंगलाला आग लागल्याचे दिसताच तत्काळ त्याची माहिती वणविभागाच्या हॅलो फॉरेस्ट 1926 किंवा संबंधित वनविभाग कार्यालय अथवाआमच्या MH29 हेलपिग हॅण्ड च्या हेल्पलाईन नं. 9850577616 यावर देऊन आग विझविण्यासाठी वन विभागाला आवश्यक असे सहकार्य करावे, असे आवाहन संस्थापक व अध्यक्ष निलेशजी मेश्राम यांनी केले.

# सिग्माथॉन रनद्वारे कॅंसरची जागृती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कॅन्सरबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी १९ मार्चला सिग्माथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. यात कर्करोगातून बरे झालेले, किडनी प्रत्यारोपण झालेले रुग्ण देखील सहभागी होऊन धावणार आहेत. अशी माहिती मंगळवारी (दि. १४) पत्रकारपरिषदेत डॉ. उन्मेष टाकळकर यांनी दिली.

यावेळी या मॅरेथॉनचे टिशर्टचे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक डॉ. मनिषा टाकळकर, वैद्यकीय अधिक्षक डॉ. अजय रोटे, डॉ. प्रफ्फुल जटाळे, मनोज रॉय यांची उपस्थिती होती. मॅराथॉन १९ मार्चला युनाटडेट सिग्मा हॉस्पिटल येथून सकाळी ५.४५ वाजता सुरू होणार असून यात १० किमी., ६ वाजता ५ किमी. ६.१५ वाजता ३ किमी. असे गट आहेत. यावेळी आरोग्य न जागृती व अवयवदानाबद्दल बॅनर स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे बक्षीस वितरण सकाळी ८.३० वाजता होणार आहे. सिग्माथॉनमध्ये ऑटिझम असणारी मुले, कॅन्सरपासून बरे झालेले रुग्ण देखील असणार आहेत. यात विविध वयोगटातील . स्पर्धकांना बक्षिसे देण्यात येतील. आरोग्य जागृतीसाठी शाळांमधून पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे. कॅन्सरबद्दल जागरुकता निर्माण करणे, लोकांना कॅन्सर हा आजार लवकर ओळखणे आणि प्रतिबंध करण्याच्या महत्वाबद्दल शिक्षित करणे हे या कार्यक्रमाचे प्राथमिक उद्देश असल्याचे डॉ. टाकळकर यांनी सांगितले. जास्तीतजास्त संख्येने या मॅराथॉनमधे भाग घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

# लोणंदच्या ब्ल्यू डायमंडचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ता.खंडाळा येथील ब्ल्यू डायमंड इंग्लिश मिडीअम स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. यावेळी विविध मराठी हिंदी गाण्यावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती आनंदराव शेळके पाटील,माजी नगराध्यक्षा स्नेहलता शेळके पाटील,माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव शेळके पाटील,लोणंद कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती दत्तात्रय बिचुकले,केंद्रप्रमुख डी.बी.धायगुडे, अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे, संचालिका सुरेखा शेंडगे,स्कूल सेक्रेटरी शुभांगी धसाडे,शाळेचे व्यवस्थापक निखिल धायगुडे, प्राचार्या हेमलता दिक्षित, देविदास चव्हाण, पत्रकार सुरेश भोईटे व इतर मान्यवर




उपस्थित होते. नृत्य सादरीकरणाच्या सुरुवातीलाच रुद्र यादव, अद्विक शिंदे, वृषभ शेळके,श्रेयान लकडे, आरव बोबडे, विराज शिंदे या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेतून न पाहता व अडखळता, अगदी स्पष्टपणे भारतीय संविधानाची उद्देशिका म्हटली. विद्यार्थ्यांचे नृत्यासाठी शिक्षिकांनी विशेष मेहनत केल्याबद्दल तसेच भारतीय संविधानाची उद्देशिका विद्यार्थ्यांनी म्हटल्याबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे यांनी कौतुक केले.संगीत खुर्ची, रांगोळी, मेहंदी आणि नृत्य स्पर्धेत यश मिळविलेल्या महिला पालक तसेच क्रीडा स्पर्धेसह संविधान परीक्षेतून लहान आणि मोठया गटातील विजेते अनुक्रमे विद्यार्थी, शिक्षिका, शाळेचे अध्यक्ष यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमसाठी तेजश्री पवार, सोनाली टाक, राणी शेळके, सुषमा शेळके, सरिता सोनटक्के, रुपाली चव्हाण,विद्या धायगुडे, अश्विनी निंबाळकर, कुमुद पाठक, सोनाली चव्हाण, गौरी पवार, सुवर्णा डोईफोडे, अक्षया ठोंबरे, सुवर्णा पडळकर यांनी विषय मेहनत घेतली.

# व्हॉइस ऑफ मीडियाची केंद्रीय कार्यशाळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** संघटनेचे भविष्यातील नियोजन, पत्रकारांना रोजगार व व्यवस्थापनाचे धडे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, अशा कृतिशील कार्यक्रमाबरोबरच पत्रकारांच्या पाल्यांसाठी वेगवेगळ्या शिष्यवृत्तीची घोषणा व संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी नव्या दमाचे पत्रकार अनिल म्हस्के यांची निवड अशा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांनी राज्यभरातील व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा मोठ्या उत्साहात पार पडली. व्हॉइस ऑफ मीडियाच्या केंद्रीय, राज्य, विभागीय व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची दोन दिवसीय बैठक बारामती येथील बारामती क्लब येथे आयोजित करण्यात आली होती.

व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, केंद्रीय सरचिटणीस चंद्रमोहन पुप्पाला, केंद्रीय उपाध्क्ष धर्मेंद्र जोरे, कोषाध्यक्ष चेतन बंडेवार, सारिका माहोत्रा, प्रदेशाध्यक्ष राजा माने, नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष ग्रामीण अनिल मस्के. राज्य कोर टीमचे प्रमुख सचिन मोहिते, बालाजी मारगुडे, विभागीय अध्यक्ष मंगेश खाटीक, विजय चोरडिया, अभयकुमार देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या अधिवेशनामध्ये पत्रकारांना घरे बांधण्याच्या विषयासंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी संघटनेच्या हाऊसिंग सोसायटी विभागाचे प्रमुख संजय मालानी यांनी मार्गदर्शन केले. पत्रकारांसाठी नवीन सर्वंकष पत्रकार गृहनिर्माण धोरण तयार करण्यात आले पाहिजे, यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. धर्मवीर भारती यांनी घरांच्या प्रोजेक्टबाबत सविस्तर माहिती दिली. पत्रकारांनी आर्थिक स्वावलंबी झाले पाहिजे, यासाठी पत्रकारितेला रोजगाराची जोड दिली पाहिजे, या



विषयावर अजय सिंग सावंत यांनी मार्गदर्शन केले. सावंत यांनी आजवर अनेकांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. परदेशांमध्ये स्किल वर्करला जास्त संधी असते. परदेशात जाण्याबाबतचा न्यूनगंड दूर सारून पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. या संदर्भात त्यांनी केरळचे उदाहरण दिले. माहिती तंत्रज्ञान व नियोजनाच्या क्षेत्रातील पत्रकारांना आवश्यक असलेला मूलमंत्र चंद्रमोहन पुप्पाला यांनी आपल्या मार्गदर्शनातून दिला. स्वतःला अपडेट ठेवले पाहिजे व सातत्याने अपग्रेड राहिले पाहिजे, तरच आपला बदलत्या परिस्थितीमध्ये निभाव लागू शकतो. आपली भाषा व्यवस्थापन, राहणीमान अपग्रेड करून आपण आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचू शकतो, असे त्यांनी सांगितले. प्रसिद्ध अशा लाडाची कुल्फी ब्रॅंडचे प्रमुख राहुल पापळ यांनी लाडाची कुल्फीच्या माध्यमातून केलेला यशस्वी प्रयोग सांगितला. राहुल यांनी पत्रकारांसाठी आपण कोणताही मोबदला न घेता रोजगाराची संधी उपलब्ध करून देऊ, असे आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. अवघ्या तीन वर्षांत हजारोंचा आपला उद्योग कोटीवर येऊन पोहोचला, असे सांगितले.

# लोककला संमेलनात लावणी सम्राज्ञी राजश्री काळेंचा डंका

## महिला दिनानिमित्त विशेष सत्कार व परिसंवादात सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**भगवान राऊत**

**अहमदनगर :** येथील सुप्रसिध्द लावणी सम्राज्ञी तथा सिने अभिनेत्री राजश्री काळे नगरकर यांच्या पारंपरिक लावणी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कौशल्य, उद्योग, पर्यटन व महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व शाल देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

संगीत नाटक अकादमी नवी दिल्ली व पु ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त बुधवार दिनांक 8 मार्च रोजी मुंबईतील प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर मध्ये आयोजित अखिल भारतीय महिला लोककला संमेलनाच्या उद्घाटन समारंभात विशेष पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आल. शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, संगीत नाटक अकादमी व W20 च्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे प्रकल्प संचालक संतोष रोकडे, मुंबई विद्यापीठातील शाहीर अमर शेख अध्यासन चे प्रमुख डॉ. प्रकाश खांडगे, लोककला अकादमी चे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे आदी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

यापूर्वी लावणी सम्राज्ञी राजश्री नगरकर यांनी अकलूजच्या राज्यस्तरीय लावणी महोत्सवात



सलग ३ वर्षे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. तसेच 'बरखा सातारकर' या मराठी चित्रपटातील मुख्य भूमिकेसाठी त्यांना महाराष्ट्र शासनाचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळालेला आहे. महाराष्ट्रातील अनेक लावणी महोत्सवा बरोबरच त्यांनी जपान, नेदरलँड, रशिया, इंडोनेशिया, न्युझीलँड या देशातही महाराष्ट्राची अस्सल पारंपारिक लावणी सादर केली आहे. तसेच 26 जानेवारी या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशाची राजधानी नवी दिल्ली येथील लाल किल्ल्यावर झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्राची पारंपारिक लावण्यांचा जिवंत देखावा त्यांनी सादर केला होता. सुपे येथील कालिका लोकनाट्य सांस्कृतिक कला केंद्राच्या माध्यमातून त्या लावणीचे सादरीकरण करण्याचे काम आपल्या भगिनी आरती काळे नगरकर व इतर महिला लावणी कलावंतांच्या माध्यमातून करतात.

रवींद्र नाट्य मंदिरात झालेल्या अखिल भारतीय महिला लोककला संमेलनात त्यांनी चित्रपटातील 'स्त्रीभिमुख लोककलेचे प्रदर्शन' या विषयावरील परिसंवादात ही आपली मते परखडपणे मांडली. यावेळी त्यांनी सादर केलेल्या आशुक् माशुक नार नाशिकची या बालेघाटी अस्सल पारंपारिक लावणी वर सादर केलेल्या नृत्य, अभिनय व अदाकारीने रसिक प्रेक्षकांना भुरळ घातली.

ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक राजदत्त यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात सिने नृत्य दिग्दर्शक सुभाष नकाशे, सोनिया परचुरे, डॉक्टर प्रकाश खांडगे व लोककला अकादमी चे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे आदी वक्ते सहभागी झाले होते. मृण्मयी भजक यांनी या परिसंवादाचे सूत्रसंचालन केले.




# शक्तिपीठांचा चित्ररथ वणीला दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथे कर्तव्यपथावर संचलन सोहळ्यात गौरवान्वित झालेल्या महाराष्ट्राच्या साडेतीन शक्तीपीठे व नारीशक्ती या चित्ररथाचे विशेष सादरीकरण १६ मार्च रोजी वणी गावात तर १७ मार्च रोजी आद्य स्वयंभू शक्तिपीठ सप्तशृंग गडावर होत असून कोल्हापूर, तुळजापूर व माहूर या तीन शक्तिपीठात चित्ररथाचे सादरीकरण केल्यानंतर आज, ता. १४ रोजी सांयकाळी आद्य स्वयंभू शक्तीपीठ सप्तशृंग (वणी) गडावर सादीरकरणासाठी वणी येथे दाखल झाला आहे. दरम्यान सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्थानिक व भाविकांनी चित्ररथ आवर्जून पाहावा, असे आवाहन केले आहे. जगभरातील प्रेक्षकांची मने जिंकलेल्या चित्ररथाला सर्वोत्कृष्ट सादरीकरणाचा व्दितीय क्रमांक मिळाला.

साडेतीन शक्तीपीठावर आधारित या चित्ररथाचे प्रदर्शन वणी व सप्तशृंग गड येथे होणार असून या शक्तीपीठाच्या चित्ररथाचा सांस्कृतिक कार्यक्रम गुरुवारी, ता. १६ रोजी सकाळी ९ वाजता वणी येथे होणार असून श्री सप्तशृंगी मातेचे मुळस्वरुप समजले जाणाऱ्या जगदंबा मातेच्या दरबारात चित्ररथ नेण्यात येणार आहे. तर शुक्रवार ता. १७ रोजी सप्तशृंग गडावर चिर रथाचे सादरीकरण होणार आहे.

महाराष्ट्रात आदिशक्तीची साडेतीन शक्तिपीठे प्रसिद्ध आहेत . साडेतीन शक्तिपीठे आणि स्त्रीशक्ती जागर 'यावर अधारित चित्ररथ होता . या चित्ररथाच्या समोर गोंधळी होते . त्याच्या मागे साडेतीन शक्तीपीठं म्हणजेच, माहूर, कोल्हापूर, तुळजापूर,आणि वणी या साडेतीन शक्तीपीठांचा देखावा दाखवण्यात आले होते .ही सगळी शक्तीपीठं म्हणजे नारीशक्तीचा सन्मान होय . पोतराजसुद्धा चित्ररथाच्या होते . एकूणच महाराष्ट्राची लोककला या ठिकाणी सादर करण्यात आली होती . चित्ररथाचा देखावा महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांना भेट देणाऱ्या भाविकांना, सर्वसामान्यांना पाहता येण्यासाठी हे प्रदर्शन वणी गाव व वणी गड येथे होणार आहे . डोळ्याचे पारणे फेडणारा हा प्रसंग टिपण्यासाठी वणीकरांसह भाविकांमध्ये प्रचंड उत्सुकता असून सर्व नागरीकांनी व भावीकांनी या चित्ररथाच्या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन वणी येथे चित्ररथ समिती वणीचे दर्शन दायमा, पियुष भवर, भास्कर पाटील, चेतन कुऱ्हाडे, प्रशांत कड, बाळासाहेब घडवजे, मयुर जैन, सतिश जाधव, संतोष दुसाने, प्रमोद भांबेरे, मनोज थोरात, दिगंबर पाटोळे, आबा मोर आदी समिती सदस्य, वणी सप्तशृंगी देवी ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद थोरात व विश्वस्त मंडळ, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ यांनी केले आहे .

प्रजासत्ताक दिनाला कर्तव्यपथावरील परेडमध्ये सादर करण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या चित्ररथाला दुसरा क्रमांक मिळाला आहे.

# गोबरगॅसच्या टाकीत पडून चौघांचा मृत्यू

## एकजण बचावला

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बारामतीतील खांडज गाव परिसरात गोबरगॅसच्या टाकीत पडून चौघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी घडली. या घटनेत एकजण बचावला असून त्याची प्रकृती अत्यवस्थ आहे. त्याच्यावर बारामतीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्रकाश सोपान आटोळे, प्रवीण भानुदास आटोळे, भानुदास आनंदराव आटोळे, बापूराव लहुजी गव्हाणे, अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. खांडज गाव परिसरातील आटोळे वस्तीत बुधवारी (१५ मार्च) सकाळी साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली. आटोळे, गव्हाणे आणि आणखी एकजण गोबर गॅसच्या टाकीत पडले. गोबर गॅसच्या टाकीत पाचजण पडल्याची माहिती मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यांना तातडीने बाहेर काढण्यात आले.पाचजणांना बारामतीतील सिल्व्हर ज्युबिली रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच आटोळे, गव्हाणे यांचा मृत्यू झाला. या घटनेत एकजण बचावला असून त्याला बारामतीतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयाच्या परिसरात नातेवाईकांनी गर्दी केली होती.

# आढाव दांपत्याचे कार्य सावित्री-ज्योतिबांसारखेच

## डॉ. सदानंद मोरे : शीलाताई आढाव यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महात्मा ज्योतिबा फुले यांना समाजसुधारणेच्या कार्यात सावित्रीबाईंनी ज्या पद्धतीने साथ दिली, त्याच पद्धतीने बाबा आढाव यांच्या सामाजिक चळवळीत शीलाताईंनी खंबीर साथ दिली. शीलाताई आणि बाबा आढाव या दांपत्याचे कार्य सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्यासारखेच आहे. हे दांपत्य आजच्या काळातील सावित्री-ज्योतिबा आहेत," असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ग्रॅव्हिटस फाउंडेशनतर्फे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत डॉ. बाबा आढाव यांची सहचारिणी म्हणून मोलाचे योगदान देणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका शीलाताई आढाव यांना पहिला जीवनगौरव पुरस्कार डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मानपत्र, सन्मानचिन्ह व एक लाख ५१ हजार रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच महात्मा फुले समता प्रतिष्ठानला ग्रॅव्हिटस फाउंडेशनच्या वतीने एक लाख एक हजार रुपये देणगीचा धनादेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ता काळबेरे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. प्रसंगी ज्येष्ठ लेखिका व पत्रकार प्रतिमा जोशी यांनी शीलाताईंची प्रकट मुलाखत घेतली. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या या पुरस्कार सोहळ्यावेळी महाराष्ट्रातील समता चळवळींचे मार्गदर्शक डॉ. बाबा आढाव, सामाजिक कार्यकर्त्या वसुधा सरदार,



सिम्बायोसिस विद्यापीठाच्या प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, माजी खासदार संजय काकडे, ग्रॅव्हिट्स फाउंडेशनच्या संस्थापिका उषा काकडे, शीलाताईंच्या भगिनी माधुरी ठोंबरे, मानसकन्या अनिता भोसले, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, प्रीती बानी आदी उपस्थित होते. डॉ. बाबा आढाव यांनी पत्नीविषयी हृद्य भावना व्यक्त करताना सांगितले की, शीलाने माझ्या प्रवासात खंबीर साथ दिली. किंबहुना, तिच्या साथीमुळे मला चळवळीत निर्भीडपणे काम उभारता आले. आज तिचा स्वतंत्रपणे सत्कार होतोय, ही आनंदाची गोष्ट आहे. हसत खेळत जीवन जगण्याचा आमचा हा प्रवास अशा पुरस्काराने आणखी वृद्धिंगत होत आहे. तिला मिळालेली दाद तिचा उत्साह वाढवणारी आहे. उषा काकडे यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. अरुण खोरे यांनी आभार मानले.

# समता प्राथमिक विद्यामंदिर, राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अरणी फाऊंडेशन वतीने आयोजित "माँसाहेब जिजाऊ कला महोत्सव 2023" या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन यूट्यूब या सामाजिक माध्यमावर करण्यात आलेले होते. संपूर्ण महाराष्ट्रातून या स्पर्धेसाठी 350 हून अधिक शाळांनी सहभाग नोंदविला होता. अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर बक्षिस वितरण सोहळा समता कन्या विद्यालयाच्या भव्य मैदानावर पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले शि. प्र. मंडळ चे अध्यक्ष के. एस. कोल्हे सर व प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुरुषोत्तम भापकर साहेब (माजी शिक्षण आयुक्त महाराष्ट्र राज्य) यांची निवड करण्यात आली. भापकार साहेब यांची शिक्षण शिक्षण महर्षी म्हणून ओळख असल्याने प्रसंगी संस्थेचे सचिव श्री पीएम



डहाके सर यांनी पुन्हा एकदा कॉपीमुक्त परीक्षा यावर सरांशी दीर्घ चर्चा केली व या उपक्रमामध्ये भापकर साहेबांचे योगदान राहील, अशी अपेक्षा दर्शविली. अरणी फाउंडेशन चे अध्यक्ष एस. एम. कुलकर्णी सर यांनी त्यांच्या फाउंडेशन बद्दल माहिती सांगितली त्यावेळी त्यांनी ग्रामीण भाग आणि शहरी भाग यातील शिक्षणामधील फरक यावर विशेष भर दिला. आणि हा फरक कमी करण्यासाठी अरणी फाउंडेशन ऑनलाईन क्लासेस घेऊन नाम मात्र पैशांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, बारावी, दहावी, तसेच पाचवी ते आठवी शिकवणी उपलब्ध करून देत आहे. या कार्यक्रमात पिशोर चे भूमिपुत्र श्री दवंगे सर यांची केंद्र प्रमुख ते शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करून गौरविण्यात आले. भापकर साहेब व अरणी फाउंडेशन या सर्वांना सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, पिशोर संस्थेचा परिचय व इतिहास सांगत असताना श्री अमोल मोकासे सर यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांवर विशेष भर देत म्हणाले "जे स्वतः मध्ये व समाजामध्ये बदल घडवून आणते ते खरे शिक्षण होय" व समाता शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निरंतर झटत असल्याचे सांगितले.

भापकर सरांनी मार्गदर्शन करताना आपल्यातील ऊर्जेचा वापर योग्य कार्यासाठी तसेच सर्वांना सारखाच मिळालेला 24 तासांचा वेळ जास्तीत जास्त सदमार्गी लावावा हा यशाचा मंत्र विद्यार्थ्यांना दिला. पुढे सरांनी स्वयंशिस्त, व्यायाम, वैयक्तिक स्वच्छता व मोबाईलचा मर्यादित वापर या बाबींवर भर देत यांचा तुमच्या यशामध्ये विशेष योगदान असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी सरांनी त्यांच्या खडतर जीवनाची उजळणी विद्यार्थ्यांसमोर मांडली.



# 'काटवट'ला वारकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**दादा घोडके**

**पैठण :** आज आपल्याकडे भाकरी बनवण्यासाठी परात नावाच एक भांड वापरले जात पण खेड्यांमधे १ ९ ८० - ९ ० च्या दशकापर्यंत एक भाकरी बनवण्यासाठी लाकडी वस्तु वापरली जायची जीला काटवट असे म्हणले जायचे. थोडीशी लंबगोल, खोलगट आणि दोन बाजुला कान असलेल हे लाकडी भांड लाकडाच्या एका गोलाकार ओंडक्याला कोरुन परातीच्या आकाराच हे भांड बनवल जायच , काही भांड्याच्या दर्शनी भागावर नक्षीकाम केले जायचे तर काही काटवटींचे कान आकर्षक असायचे. पण काळाच्या ओघात हे भांड आज दुर्मिळ झालय, सहसा खेड्यामध्ये काही लोकांकडे आहे पण तेही तुटलेल्या अवस्थेत, अडगळीच्या खोलीत. आपण जेव्हा लहान होतो. तेव्हा आमची आजी, आई, लाकडी काथवडीत बाजरी, ज्वारीचे पिठ मळून त्यातच भाकऱ्या थापायची. तीला परातीत भाकरी कधी जमलीच नाही पण नंतरच्या काळात तीच्या काथवडीला मधोमध छीद्र पडल्यान तीने ती वापरणही सोडल आणि स्वयंपाक घरसुध्दा आजीच्या सासुच्या म्हणजे माझ्या पणजीच्या काळापासुन असलेली ती काथवड आज लोकांना फक्त एक पुरातन लाकडाच भांड असल तरी आमच्यासाठी सुमारे तीन पिढ्यांच्या भाकरी त्या काथवडीत बनल्या होत्या म्हणुन काही जनानी ती अजुनही जपुन ठेवली आहे . काथवडीसारख्या अनेक वस्तु आज काळाच्या ओघात नष्ट होत असल्या तरी पण काही माणस अजुनही पुरातन वस्तु अगदी आपुलकीन जपुन ठेवताना दिसतात. याच काटवटची पैठणच्या नाथषष्टीत मोठ्या प्रमाणात दुकाना लागल्याने पुन्हा पारंपरिक भाकरी थापण्याच्या काथोट खरेदीसाठी महिलावर्गाने पसंती दर्शवल्याने नाथषष्टीत काटवट खरेदीसाठी मागणी वाढली आसल्याचे चित्र दिसत आहे.

# शांतिब्रह्म श्री एकनाथ महाराज मिशन पैठणचा २०२३ पुरस्कार सोहळा संपन्न !

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** श्रीएकनाथ षष्ठीच्या निमित्ताने शांतिब्रह्म श्रीएकनाथमहाराज मिशन, पैठण या संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी संत एकनाथ महाराजांच्या नावाने विविध सहा पुरस्कार देण्यात येतात. त्यात "भानुदास एकनाथ पुरस्कार" हा सर्वोच्च पुरस्कार श्रीक्षेत्र देहू येथिल गाथा मंदिराचे अध्यक्ष व जेष्ठ कीर्तनकार ह.भ.प.श्री पांडुरंग महाराज घुले यांना नाथवंशज व उपस्थित संत महंतांच्या उपस्थितीत देण्यात आला. त्यांना मानपत्र, नाथांचा फेटा, रुपये पंचविस हजार, एकनाथ महाराजांची मूर्ती, एकनाथमहाराज चरित्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिशनप्रमुख तथा नाथवंशज ह.भ.प. योगिराजमहाराज महाराज गोसावी पैठणकर यांनी केले. श्रीएकनाथसंस्थानाधिपती ह.भ.प.वै. श्री भैय्यासाहेब महाराज गोसावी पैठणकर वारकरी भूषण पुरस्कार श्रीक्षेत्र पैठण येथिल संत एकनाथमहाराज प्रासादिक वारकरी शिक्षण संस्थेचे प्रमुख व जेष्ठ कीर्तनकार ह.भ.प.श्री रखमाजी महाराज नवले यांना देण्यात आला.

मिशनतर्फे दिल्या जाणारा 'श्रीसंत एकनाथमहाराज प्रबोधनार्तंड पुरस्कार' हा पुणे येथिल युवा कीर्तनकार ह.भ.प.श्री संतोष महाराज पायगुडे यांना देण्यात आला. पार्श्वगायक तथा अभिनेता ह.भ.प.श्री अवधुतजी गांधी यांना 'श्रीसंत एकनाथमहाराज स्वरमार्तंड पुरस्कार' देण्यात आला. श्रीक्षेत्र आळंदी येथिल मृदंगाचार्य ह.भ.प.श्री दासोपंतस्वामी आळंदीकर यांना 'श्रीसंत एकनाथमहाराज तालमार्तंड पुरस्कार' देण्यात आला.तर पंढरपूर येथिल वारकरी पाईक संघाचे प्रदेशाध्यक्ष ह.भ.प.श्री रामकृष्ण महाराज वीर यांना 'श्रीसंत एकनाथमहाराज वारकरी सेवा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

अनेक वर्षांपूर्वी विचाराधीन असलेला हा विचार श्रीएकनाथी भागवताच्या ४५० व्या जयंतीच्या वर्षी जाहीर झाल्याने सर्वांनी आनंद व्यक्त केला. नाथवंशजांनी हे कार्य हाती घेतल्याने वारकरी संप्रदायाने यांचे स्वागत केले. यावेळी अनेकांनी या घोषणेचे स्वागत केले व संपूर्णपणे सहकार्याची तयारी दर्शविली. यावेळी पांडुरंगमहाराज घुले यांनी ५१०००/- ची देणगी जाहीर केली. या सोहळ्यासाठी संतसाहित्याचे गाढे अभ्यासक ह.भ.प.श्री चैतन्यमहाराज देगलूरकर, नाथवंशज ह.भ.प.श्री सरदारमहाराज गोसावी, भगवानगडचे महंत न्यायाचार्य डॉ श्री नामदेवमहाराज शास्त्री, नारायणगडचे महंत श्री शिवाजी महाराज, वासकर फडाचे प्रमुख श्री राणामहाराज वासकर, जेष्ठ कीर्तनकार अमृताश्रमस्वामी महाराज, तारकेश्वरगडचे महंत आदीनाथमहाराज शास्त्री, ज्ञानेश्वरमहाराज जळगांवकर, श्रीराम महाराज झिंजुर्के, आसाराम महाराज बडे, चवरे महाराज, गणेशमहाराज कराडकर, भाऊसाहेब महाराज गोसावी, नाथवंशज हरिपंडीतबुवा, मेघशामबुवा, छैय्यामहा राज, श्रीकृष्णबुवा,विनितमहाराज, श्रेयसबुवा, ज्ञानराजबुवा, श्रीरंगबुवा,माधवदास महाराज राठी, नवनाथमहाराज गांगुर्डे, आदी मान्यवरांसह निलेश पाटील, चेतन चौधरी व सदस्य तसेच शिष्य परिवाराची उपस्थिती होती.



**मुख्याधिकाऱ्यांना वारकऱ्यांनी झापले :** नाथषष्टी सोहळ्यात आलेल्या वारकऱ्यांनी देण्यात येणाऱ्या सोई सुविधात वाळवंटात विसावलेल्या काही दिंड्याना पिण्याचे पाणी, तसेच शौचालयाची व्यवस्था करण्यात आली नसल्याने पैठण नगर परिषदचे मुख्याधिकारी संतोष आगळे हे वारकऱ्यांच्या फडावर दिंडी प्रमुखाचे स्वागत करण्यासाठी गेले असता एका दिंडी प्रमुखाने सत्कार झाल्यानंतर सर्वासमोरच पाणी व शौचालयाची सुविधा न मिळाल्याने झाफ, झाफ झापल्याने मुख्याधिकारी चुपचाप वाळवंटातून निघुन आले, यावरून असे निदर्शनास येते की नगर परिषद नाथषष्टीत वारकर्यांना सोयीसुविधा देण्यास असर्थ ठरली की काय ही चर्चा गावभर होत आहे .

# जुन्या पेंशनसाठी मुख्यधिकाऱ्यांना दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राज्य शासन व मध्यवर्ती कर्मचारी संघटना यांची काल १३ मार्च रोजी जुन्या पेंशन बाबत बोलणी फिस्कटल्याने वैजापूर येथील शासकीय व निम शासकीय कार्यालयेचे कर्मचारी जि. प.शाळा व न.प. शाळांचे शिक्षक मंगळवार( ता,१४ )पासून बेमुदत संपावर गेले आहेत. न. प. शाळा १९आहेत या शाळेतील सर्व शिक्षक संपावर गेले त्यापूर्वी त्यांनी मुख्यधिकारी भागवत बिघोत यांना निवेदन दिले व संपावर गेले या समयी त्यांच्या समवेत तालुका पेंशनर्स शाखेचे अध्यक्ष धोंडीरामसिंह राजपूत व बबन क्षीरसागर यांनीही उपस्थित राहून संपावरील कर्मचाऱ्यांच्या मागण्या रास्त असून शासनाने जुनी पेन्शन योजना तात्काळ लागू करावी अशी मागणी केली, नगर परिषद शिक्षक भारती शाखेचे सी.पी. पाटील, किशोर साळुंकर, सर्वश्री वाघ, रावकर, कुमावत, वैद्य, उसारे यांनी घोषणा देत"एकच मिशन जुनी पेंशन" अशी जोरदार मागणी केली. हम सब एक है अशाही घोषणा दिल्या,पंचायत समिती समोर शिक्षक भारती संघटनेचे शिक्षकवृंद व कर्मचारीवृंद यांनी सभा घेऊन जुन्या पेंशन ची जोरदार मागणी केली. येथे ही राजपूत यांनी कर्मचारी मागणी जुनी पेंशन मिळाली पाहिजे या मागणीला पेंशनर्स संघटनेचा पाठिंबा असल्याचे जाहीर केले. या प्रसंगी शिक्षक भारती संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब जगताप, राज्य कोषाध्यक्ष किशोर कदम, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख दत्तात्रय गायकवाड, सचिव अनिल जगदाळे,विशाल तांबे, अनिल नाईकवाडी, रवी अनर्थे,संतोष सोनवणे, गणेश रोठे यांची उपस्थिती होती.



# विजेचा धक्का लागून पिता-पुत्र ठार

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** शेतातील विहिरीवरील विद्युत पंप सुरु करताना विजेचा धक्का लागून पिता-पूत्र ठार झाल्याची घटना तालुक्यातील दहिदी येथे घडली.समाधान कळमकर (३०) हा तरुण शेतकरी मंगळवारी कांदे काढण्यासाठी कुटुंबासह शेतात गेला होता. तेव्हा मजुरांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी तो विहिरीवर गेला. त्यासाठी विद्युत पंप सुरु करण्याचा प्रयत्न केला असता त्यास विजेचा धक्का बसला. ही बाब लक्षात येताच त्याचे पिता पंढरीनाथ कळमकर (५८) हे मदतीसाठी धावले. त्यांनी हातानेच मुलाला बाजुला करण्याचा प्रयत्न केल्यावर त्यांनाही विजेचा जोरदार धक्का बसला. त्यात हे पिता-पूत्र जागीच ठार झाले. मालेगाव येथील सामान्य रुग्णालयात या दोघांचे मृतदेह नेण्यात आले. तेथे शवविच्छेदन करण्यात आल्यावर दोघांवर खडकी येथे एकाच वेळी अंत्यसंसकार करण्यात आले.

# महिला भावी पिढी घडविणाऱ्या उत्तम शिलेदार

## उप विभागीय पोलीस अधिकारी महक स्वामी यांचे प्रतिपादन



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथे आजची महिला उद्याची या देशाची भावी पिढी घडविणारी उत्तम शिलेदार तेंव्हाच बनू शकते जेंव्हा ती राजमाता जिजाऊ सारखे सुसंस्कार आपल्या मुलां-बाळावर करून आदर्श मुलगा-आदर्श मुलगी घडवू शकते व आजची उत्तम शिलेदार बनू शकते, असे प्रतिपादन वैजापूर उपविभागांच्या उप विभागीय पोलीस अधिकारी आय.पी.एस. श्रीमती महक स्वामी यांनी सोमवार रोजी आयोजित महिला मेळाव्यात काढले,त्या पुढे म्हणाल्या की, महिलाच्या हितासाठी, रक्षणासाठी व महिलांवरीलअन्याय अत्याचार याच्या विरुद्ध आवाज उठविण्यासाठी सरकाने महिला हिताचे अनेक कायदे काढले त्याचा लाभ घेतला पाहिजे. महिला सक्षम व सुदृढ झाली पाहिजे, असेही त्या पुढे म्हणाल्या प्रमुख पाहुणे समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत होते. ते म्हणाले की, महिलाना सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची दारे उघडी करुन दिलेली आहेत, त्यांनी उच्च शिक्षण घ्यावे व मुलींना ही पूर्ण शिक्षण द्यावे, मुलीच्या जन्माचे स्वागत करावे, संस्कार व संस्कृती, नीती मूल्ये याचे पालन करावे, मुलींनी आपल्या माता पित्याची मान समाजात खाली झुकेल असे कोणतेही गैर वर्तन टाळावे असे ही त्या पुढे म्हणाले, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रतिमा सोनवणे होत्या. त्यांनी ही महिलांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले. निर्मला इन्स्टिट्यूटने आयोजित केलेल्या या महिला मेळाव्यात ग्रामीण भागातील महिला व मुली मोठया संख्येने आल्या होत्या त्यांनी महिला जन जागृती साठी गीते, नाटिका, ओव्या,जात्यावरील गीते सादर केली. या प्रसंगी सिस्टर मार्गारिट,नॅन्सी रोद्रीग्ज, छाया बंगाळ, इरफान सय्यद यांनी कार्यक्रम घडवून आणण्यासाठी परिश्रम घेतले.

# 2 हजारांची लाच घेताना लाच लुचपत विभागाने पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** गुरांचा गोठा बांधकामाचे बिल मंजुरीसाठी पाठविण्याकरिता तक्रारदाराकडून दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना गोरेगाव पंचायत समितीच्या कनिष्ठ अभियंत्याला (कंत्राटी) अटक करण्यात आली. ही कारवाई मंगळवारी (१४ मार्च) हिरडामाली येथील मिथून पान सेंटर येथे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने केली. जगदीश सदाशिव रहांगडाले असे आरोपीचे नाव आहे.

क्रारदाराच्या वडिलांच्या नावाने महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत २०२१-२२ मध्ये गोठा बांधकामाकरिता ७७ हजार रुपये अनुदान मंजूर झाले होते. त्यानुसार तक्रारदाराने फेब्रुवारी २०२३ मध्ये गोठ्याचे बांधकाम पूर्ण केले. दरम्यान, बांधकाम व बांधकामाच्या बिलाची तपासणी करून बरोबर असल्याचा शेरा नमूद करून बिल मंजुरीसाठी पाठविण्याकरिता कनिष्ठ अभियंता रहांगडाले याने तक्रारदाराकडून यापूर्वी पाच हजार रुपये घेतले.

आणखी तीन हजार रुपयांची मागणी केली. परंतु, तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. विभागाच्या पथकाने सोमवारी पडताळणी केली. यावेळी आरोपी जगदीश रहांगडाले याने तक्रारदाराला तडजोडीअंती दोन हजार रुपये व कोंबड्याचं जेवण मागितल्याच स्पष्ट झाले. दरम्यान, पथकाने मंगळवारी हिरडामाली येथील मिथून पान सेंटर येथे तक्रारदाराकडून कनिष्ठ अभियंता रहांगडाले याला दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक केली.

# अस्थी विसर्जन नदीमध्ये न करता त्यावर केले वृक्षारोपण !

## पर्यावरण पूरक संदेशाचे होतंय सर्वत्र कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील जळकी बाजार येथे पारंपरिक परंपरेला छेद देत तिसऱ्या दिवशी रक्षा नदीच्या पाण्यात विसर्जित न करता त्यावर झाडे लावण्याचा नवीन पायंडा शिवतीर्थ जळकी बाजार येथील दांडगे पाटील परिवाराने समाजाला घालून दिला. सिल्लोड तालुक्यातील शिवतीर्थ जळकी बाजार येथील ज्येष्ठ नागरिक कै.लक्ष्मण आनंदा दांडगे यांचे काल वयाच्या 74 व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पाश्चात मुले, सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.

सिल्लोड भाजपा सरचिटणीस राजेंद्र दांडगे यांचे ते वडील होते. वडिलांच्या आकस्मिक निधनाने दांडगे पाटील परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांचा विचारांचा वारसा आणि संस्कार पुढे चालू ठेवण्यासाठी व त्यांच्या स्मरणार्थ दांडगे कुटुंबीयांनी वडिलांच्या अंत्यविधीनंतर रक्षा नदीत टाकल्या नाहीत, तर जमिनीत रक्षा विसर्जन करून त्या जागी वृक्षारोपण केले. घरात दुःखमय वातावरण असताना देखील हा सकारात्मक विचार समाजाला आदर्श देणारा ठरला आहे. आजही समाजात अंत्यसंस्कारानंतर



रक्षा नदीत विसर्जित करण्याची प्रथा आहे या प्रथेला फाटा देत राजेंद्र पाटील दांडगे यांच्या वडिलांच्या निधनानंतर जमिनीत रक्षा विसर्जित करून त्या जागी वृक्षारोपण करत,एक आदर्श संदेश समाजाला दिला. रक्षा विसर्जन नकरता वृक्षारोपनाच्या निर्णयाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# ऋणानुबंध बौद्ध वधु-वर परिचय रविवारी मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** ऋणानुबंध समाज विकास संस्था, चिखली,रजि. नं.534 F-11058 द्वारा संचालीत ऋणानुबंध बौध्द वधुवर सुचक केंद्राच्या वतीने बौध्द वधुवर परीचय मेळावा दि.19 मार्च 2023 रोज रविवार दुपारी 01:00 ते 05:30 वाजेपर्यंत पंचशील बुध्द विहार, गजानन नगर, चिखली ता. चिखली जि. बुलडाणा येथे आयोजित करण्यात आला आहे तरी विवाह ईच्छुक बौध्द वर वधु यांनी या परीचय मेळाव्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

सविस्तर असे की,बौद्ध वधु-वर परीचय महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात बौध्द धर्मातील डॉक्टर, वकील, ईंजिनीअर, क्लास-1, क्लास-2, सरकारी, निमसरकारी, प्रोफेसर, शिक्षक, मॅनेजर, व्यावसायिक, उच्चशिक्षीत, पदवीधर, शेतकरी, मजुरदार, कंपनीत नोकरी, स्व व्यवसाय, प्रथम वधु-वर, घटस्फोटीत, विधुर विधवा अपंग व बौध्द समाजातील विवीध क्षेत्रातील स्थळे एकच ठिकाणी भेटतील, मेळावा 01:00 ते 03:30 वाजेपर्यंत सर्व मेळावे चे मेंबर च्या प्रोफाइलची माहीती पाहता येईल 03:30 वाजल्यापासून प्रत्यक्ष मुल मुली आपल्या प्रोफाइल सांगतील कोणालाही कोणाची प्रोफाइल पसंत असेल तो ते बातचीत करू शकता व ऋणानुबंध बौध्द वधुवर सुचक केंद्र तुम्हाला सहयोग करेल. अपेक्षा आहे की आपल्याला मनपसंत सोयरीक भेटावी आणि आपल्या घरी लग्नसराई चा आनंद असावा.

तसेच मेळाव्यामधे नाव नोंदणीसाठी प्रा.डॉ. सुभाष राऊत,प्रा.पि.एस.खिल्लारे, एस एस गवई, अर्जुन बोर्डे, भारत साबळे दयानंद निकाळजे, प्रताप मोरे पत्रकार, प्रशांतभैया डोंगरदिवे, सौ रुपाली प्र. डोंगरदिवे किंवा ऋणानुबंध बौध्द वधुवर सुचक केंद्र,8855850378 / 9689331853 किंवा ऋणानुबंध समाज विकास संस्था,चिखली,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग नविन तहसिल समोर, BOI चे ATM शेजारी चिखली जि. बुलडाणा येथे संपर्क करावा असे संस्थेच्या वतीने कळविण्यात आले आहे.



# रुग्णाच्या उपचारासाठी २५ हजारांची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** दोन्ही किडन्या निकामी झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीतील रुग्णास २५ हजारांची आर्थिक मदत करत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी माणुसकीचे दर्शन घडविले. तालुक्यातील पांडेपोखरी येथील अंगद जगताप ( वय २६ ) यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या आहेत. ऑपरेशनसाठी मोठ्या प्रमाणात खर्च लागणार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. सध्या त्यांच्यावर जालना येथील एका हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल भैया आकात यांनी २५००० /- ची आर्थिक मदत केली.आकात यांनी अंगदचे वडील आप्पासाहेब जगताप यांच्याकडे आर्थिक मदतीचा धनादेश दिला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य वसंतराव जगताप, माजी सरपंच सोनाजी गाडेकर, विलास ठोंबरे, कृष्णा गोरे, आकाश जगताप, प्रल्हाद गायकवाड यांची उपस्थिती होती.

> पांडेपोखरी येथील आप्पासाहेब जगताप यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे . त्यातच मुलाच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्याने त्यांच्या कुटुंबासमोर मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे .अडचणीत सापडलेल्या माणसाला वेळीच मदत करावी अशी आपली जुनी संस्कृती आहे .मानवतेच्या भावनेतून ही मदत केली . – **कपिल आकात**

# हनुमंत कोळी यांच्या निवडीने विजय पतसंस्थेने टाकली कात

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील स्वर्गीय अजितसिंह जहागीरदार यांनी परिसारातील गोरगरीब व गरजूसांठी स्वतःच्या व सभासदांच्या अथक प्रयत्नातून उभा केलेली विजय नागरी सहकारी पतसंस्था अनेक वर्षांपासून गावामध्ये अगदी सुरळीतपणे चालू होती.परंतु मध्यंतरी काळात काही तांत्रिक अडचणीमुळे व कर्जदारांनी वेळेत कर्जफेड न केल्यामुळे स्वर्गीय अजितसिंह जहागीरदार यांच्या निधनानंतर पतसंस्था मोडखळीस आली व अजितसिंह जागीरदार यांनी अथक प्रयत्नातून नावारूपाला आणलेली पतसंस्था अगदी संत गतीने चालू लागली. परंतु आज बुधवार दिनांक 15 मार्च रोजी स्वर्गीय अजितसिंह जहागीरदार यांचे सुपुत्र तथा सोलापूर जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन चे माजी सभापती संग्रामसिंह जहागीरदार यांच्या मार्गदर्शनाखाली एक बैठक आयोजित करण्यात आली व या बैठकीत आज रोजी पिलीवसह परिसरामध्ये एक निष्कलंक व्यक्ती म्हणून ओळख असलेले हनुमंत रामचंद्र कोळी यांची विजय नागरी पतसंस्थेच्या चेअरमन पदी बिनविरोध निवड करण्यात आली.त्यामुळे विजय नागरी पतसंस्थेने कात टाकली असून संत गतीने चालत असलेली पतसंस्था पुन्हां नव्या उमेदीने उभारी घेईल असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. यामध्ये शब्बीर इसाक काझी यांची व्हाईस चेअरमनपदी निवड करण्यात आली असून संचालक मंडळ खालील प्रमाणे असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी बंडगर साहेब यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.संग्रामसिंह जहागीरदार,अविनाश जेऊरकर,प्रकाश जाधव,उमेश देशमुख,शिवाजी इंगळे,सुभाष बुगड ,नाना मदने,जयश्री खरे मॅडम,सुषमा ताई जामदार इत्यादी नामांकित लोकांचा संचालक मंडळात समावेश करण्यात आला आहे.यावेळी सरपंच नितीन मोहिते,माजी चेअरमन दत्तात्रय जावळे, माजी व्हाईस चेअरमन शंकर करडे, विजयसिंग राजपूत, मोहसीन शेख मॅनेजर किरण आर्वे,निवडणूक निर्णय अधिकारी बंडगर साहेब यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



# महावितरणच्या तंत्रज्ञास मारहाण; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नारेगावात वीजबिल वसुलीस गेलेल्या महावितरणच्या तंत्रज्ञास मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या ग्राहकावर सिडको एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमीन शेख असे आरोपीचे नाव आहे.

महावितरणच्या चिकलठाणा एमआयडीसी शाखेत कार्यरत तंत्रज्ञ योगेश गायके व बाह्यस्रोत कंत्राटी कर्मचारी अब्दुल अजिम शेख हे दोघे बुधवारी ( १५ मार्च ) सकाळी नारेगाव येथील नाला डीपी व मनपा डीपीवरील ग्राहकांकडील वीजबिलांच्या वसुलीसाठी गेले होते. दुपारी साडेबाराच्या सुमारास अजीज कॉलनीमध्ये एका ग्राहकाचे वीजबिल तपासले असता एका महिन्यात केवळ ८ युनिट वापर आढळला. त्यामुळे गायके व शेख यांनी मीटर तपासायचे आहे असे म्हणताच आरोपीने गायके यांच्या हातातील पक्कड हिसकावून त्यांच्या डोक्यावर मारली. त्यात गायके रक्तबंबाळ झाले. तसेच आरोपीने गायके व शेख यांना शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. घटनेनंतर तंत्रज्ञ गायके यांनी सिडको एमआयडीसी पोलिस ठाणे गाठून फिर्याद नोंदवली.

# गिरजा नदीच्या पात्रातील वाळूवर तस्करांचा डल्ला

## पोलीस व महसूल विभागाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोदबाजार परिसरातील सर्वात मोठे पात्र असलेल्या गिरीजा नदीला सद्या वाळूतस्करांनी चांगलेच पोखरले आहे. रात्रीला त्यांचा हा गोरखधंद्याचा खेळ चालत असताना बाबू मंडळींकडून मात्र त्यांना अभय मिळत असल्याचा आरोप ग्रामस्थांमधून होत आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकार्यांनी याकडे लक्ष देऊन बेसुमार होणारा वाळू उपसा थांबवावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

गावातील बऱ्याच ट्रॅक्टर चालकांनी वाळू तस्करीचा गोरख धंदा अवलंबला आहे. काही ठगांचा तर हा वार्षिक व्यवसायच झाला असून त्यातून त्यानी बरीच माया पुंजी जमवली आहे. काही बाबू मंडळींचेही यात हात ओले होत असल्याने तस्करांचे फावत आहे. सद्या पडत



असलेली कडाक्याच्या थंडीने सर्वत्र लवकर सामसूम वातावरण होत असल्याने या थंडीचा वाळूचा अवैध उपसा करणाऱ्यांना चांगलाच फायदा होत आहे. तस्कारांचे पंटर रात्रभर जागोजागो असलेल्या नाक्यावर शेकोट्या करुन वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कोणी पथक कारवाईसाठी तर येत नाही ना ? म्हणून नदी पात्रात वाळु भरणाऱ्यांना लोकेशन देण्यासाठी थांबलेले असतात. प्रशासनाचा महिन्याकाठी लाखो रुपयांचा महसूल बुडत असताना करवाईत दिरंगाई होत असल्याने वाळू उपसा बोकाळला आहे. अवैध वाळू उपसा रोखण्याची जबाबदारी महसूल विभाग, पोलिस प्रशासनासह गाव पातळीवर स्थानिक सरपंच, ग्रामसेवक व तलाठी यांच्यावर सोपवलेली असताना याकडे सर्रास दुर्लक्ष केले जात आहे. शिवाय प्रत्येक गावात प्रशासनाचा दुत म्हणून पोलिस पाटील कार्यरत असताना वाळू तस्करी होत असल्याची माहिती प्रशासनाकडे दैनंदिन जात नसेल तर नवलच म्हणावे लागेल. दरम्यान, नदीपात्रातील एकाही पट्याचा लिलाव झालेला नसताना परिसरात वाळूचे मोठ मोठे ढिग जमा झालेले दिसत आहे. प्रशासनाने साठेबाजांकडून तस्करांची नावे मिळवल्यास एका दिवसात सगळे जाळ्यात अडकतील. मात्र काहींचे याप्रकरणात खिसे गरम होत असल्याने कारवाईला बगल मिळत असल्याची चर्चा सद्या रंगत आहे.तर महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने वाळू तस्करांनी होदोस घातला आहे परिसरातील रस्तावरून रात्रभर वाळूची वाहतूक सुरू असते.

# श्रीष्टी, गंगासावंगी परतूर येथील पुलाचे काम का रखडले

## आ. बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत लक्षवेधी प्रश्न केले उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** राज्याचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार



यांनी आज महाराष्ट्र विधानसभेत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करत शेगाव पंढरपूर दिंडी मार्गावरील श्रीष्टी ता परतुर व गंगासांगी ता परतुर येथील, चारशे किलोमीटर शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग पूर्ण होऊनही या फुलांचे काम का रखडले यावरून मेघा कंपनी व रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता यांच्यावर काय कार्यवाही करणार असा प्रश्न उपस्थित केला.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की गोदावरी नदी ही राष्ट्रीय संपत्ती असून, नदीपात्रातील पुलाचे काम करण्यास कंत्राटदार कंपनीला कुठलीही अडचण नव्हती यासंदर्भात कार्यकारी अभियंता यांच्या सोबत वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठका झाल्या मात्र कार्यकारी अभियंतांनी कंपनीला पाठीशी घालण्याचा सतत प्रयत्न केल्यामुळे हे काम होऊ शकले नाही दोन्ही बाजूच्या भरावासाठी दहा एकर जमीन संपादनाची आवश्यकता आहे मात्र अद्यापही ते झालेले नाही, तर श्रीष्टी येथील पुलाच्या संदर्भामध्ये बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की शेगाव पंढरपूर दिंडी मार्गावरील या पुलाचे काम पूर्ण असल्यामुळे या ठिकाणाहून जुन्या पुलावरून जाताना एक एसटी बस पुराच्या पाण्यात वाहून जाता जाता बचावली त्यामध्ये 23 प्रवासी गावकऱ्यांच्या मदतीमुळे सुखरूप वाचले नसता मोठा अनर्थ झाला असता, श्रीष्टी येथील पुलाच्या बांधकामा संदर्भामध्ये बोलताना ते पुढे म्हणाले की केवळ एक एकर भूसंपादनासाठी हा पूल गेल्या पाच वर्षापासून पूर्ण करण्यात आलेला नसून यासंदर्भामध्ये कंपनी व कार्यकारी अभियंत्यावर काय कार्यवाही केली जाईल असा सवाल यावेळी विधान भावनात त्यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाली की कार्यकारी अभियंता यांनी हे प्रकरण कोर्टात चालू असल्याची खोटी माहिती दिली असून याबाबत कुठल्या प्रकारची कारवाई सरकार करणार आहे अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित केला.

यावर उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी उत्तरा दाखल असे सांगितले की केंद्र सरकारकडे या गोष्टीचा प्रस्ताव दाखला असून याचा पाठपुरावा राज्य सरकार करीत असून यासंदर्भात लवकरच निर्णय होईल मात्र कार्यकारी अभियंता उपकार्यकारी अभियंता व कंत्राटदार कंपनी यांनी जर याबाबतीत दिरंगाई केली असेल तर निश्चितपणे अधीक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून कारवाई केली जाईल, असे आश्वासन या प्रश्नाच्या उत्तरात मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.



# भा.ज.पच्या वतीने दिंडी प्रमुखाचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** संत शांतिब्रह्म एकनाथ महाराज षष्ठी निमित्त प्रमुख दिंडीना भेट देऊन ह.भ.प.महाराजाचा व दिंडी प्रमुखाचा सन्मान करण्यात आला यावेळी मा नगराध्यक्ष तथा भाजयुमो जिल्हाध्यक्ष सुरजजी लोळगे, जिल्हा संघटन सरचिटणीस लक्ष्मण जी औटे, महेश जी जोशी, बंडुभाऊ आंधळे, आशिष मापारी, सुरेश गायकवाड, विजय चाटुपळे, सिद्धार्थ परदेशी, दाजी अंबेकर, कैलास बरकसे, भगवान गालफाडे, एकनाथ जाधव. सुनिल वीर.विशाल पोहेकर. प्रमोद कोल्हे, सतोष मिस्त्री, गणेश डुकरे, रविराज क्षीरसागर, शिवनाथ सोनवने, कल्याण बाबर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# राहुल देशपांडे यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध

आधुनिक केसरी न्यूज




**छत्रपती संभाजीनगर :** कधी आक्रमक, कधी अलवार गायकीने रसिकांना मंत्रमुग्ध करणारे गायक पं. वसंतराव देशपांडे यांची गाणी, त्यांचे सूर, त्यांच्या आठवणी जागवणारा आगळावेगळा 'वसंतोत्सव' रविवारी (१२ मार्च) रसिकांनी अनुभवला. वसंतरावांचे नातू व आजच्या पिढीतील लोकप्रिय गायक राहुल देशपांडे यांच्या गायकीतून वसंतरावांची गाणी नव्याने रसिकांसमोर सादर करण्यात आली.

संत एकनाथ रंगमंदिर येथे वसंतोत्सव हा बहारदार कार्यक्रमाचे आयोजक पुनीत बालन ग्रुप होते. ज्येष्ठ गायक पं. वसंतराव देशपांडे यांना समर्पित या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात लोकप्रिय गायक राहुल देशपांडे हे शास्त्रीय गायन सादर केले. वसंतरावांची जडणघडण, त्यांची जिद्द, अभ्यास अशा अनेक आठवणी रसिकांसमोर उलगडल्या. सखी मन लागेना'नंतर नंद केदार राग सादर केला. त्यांना तबल्यावर प्रसाद पाध्ये आणि हार्मोनियमवर आदित्य ओक साथसंगत दिली. दुसऱ्या सत्रात 'द राहुल देशपांडे कलेक्टिव'चे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये राहुल देशपांडे यांनी 'पानी पानी रे खारे पानी रे' हे गीत सादर केले. रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटाने त्यासदाद दिली. 'तेरे खुशबू मे बसे खत', 'देव देव्हाऱ्यात नाही' अशी एकापेक्षा एक गाणी सादर करून संगीतमय वातावरण निर्मिती केली. साडेतीन तास रंगलेल्या या मैफलीचा समारोप 'कानडा राजा पंढरीचा' या भक्तिगीताने करण्यात आला. प्रसाद पाध्ये (तबला), आदित्य ओक (हार्मोनियम), रोहन वणगे (ऑक्टोपॅड), (कीबोर्ड) यांनीही सादसंगतदेत उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाला एम. आय. टी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी हे मुख्य प्रायोजक होते. तर लोकमान्य मल्टिपर्पज, मगरपट्टा सिटी ग्रुप, सुहाना, एंड्रेस हॉसर यांचे सहकार्य लाभले.

# निवृत्त प्राध्यापकास वर्षभरापासून पगार देण्यास टाळाटाळ

## पीईएस तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रकार; तणावातून दोन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पगार मिळत नसल्याने राजीनामा दिलेल्या प्राध्यापकाचा थकित पगार न देता मानसिक छळ करण्यात येत असल्याने त्यांनी दोन वेळा आत्महत्या करण्याचा प्रकार समोर आला आहे. वारंवार पत्रव्यवहार करूनही पीईएस तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्रशासन पगार देत नसल्याचा आरोप निवृत्त प्राध्यापक आशिष गायकवाड यांनी केला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आशिष गायकवाड हे पीईएस तंत्रनिकेतन महाविद्यालयात मेकॅनिकल इंजिनियर विभागात प्रभारी विभाग प्रमुख म्हणून ७ सप्टेंबर २०११ रोजी रूजू झाले होते. काही वर्ष त्यांना नियमित पगार देण्यात येत होता. नंतर महाविद्यालय प्रशासन नियमित पगार करत नसल्याने गायकवाड यांनी १५ जून २०२० मध्ये प्राध्यापक पदाचा राजीनामा



दिला आहे. त्यामुळे त्यांचा राहिलेला पगार सहाव्या आयोगानुसार मिळणे अपेक्षित होते. त्यासाठी त्यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे पाठपुरावा व पत्रव्यवहार केला. तेव्हा प्राचार्यांनी त्यांना तीन महिन्यांचा पगार दिला. मात्र त्यानंतर गायकवाड यांना पैसेच नसल्याचे सांगून टाळाटाळ करण्यात येऊ लागली. प्रशासन दाद देत नसल्याने त्यांनी तंत्रनिकेतन उपसंचालकांकडे पत्रव्यवहार केला. तेव्हा उपसंचालक कार्यालयाने महाविद्यालयास गायकवाड यांचा पगार देण्याबाबत कळविले. त्यावर महाविद्यालयाने ३० डिसेंबरपर्यंत गायकवाड यांचा पगार करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर वर्षभराचा राहिलेल्या पगार न करता महाविद्यालयाने फक्त तीन महिन्यांचा पगार केला. मात्र आता मार्च महिना सुरू झाला, तरी गायकवाड यांचा पगार देण्यात आला नाही. त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहचा प्रश्न निर्माण झाला आहे. या होत असलेल्या मानसिक छळास कंटाळून गायकवाड यांनी तणावातून दोन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118, राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142, 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in